**पुणे महानगरपालिका**

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक –९/२/२०२४**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.१३**
**फेब्रुवारी २०२४**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **बुधवार,दि.१४/२/२०२४** रोजी **दुपारी ४.०० (चार )** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

विषय क्र.३६९

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१
३) मनपा ठराव क्र.८१५,दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२४,दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१६९,दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२१७,दि.१/११/२०२२
७) मनपा ठराव क्र.२६८,दि.१/१२/२०२२
८) मनपा ठराव क्र.३०१,दि.२८/१२/२०२२
९) मनपा ठराव क्र.३६९,दि.१७/२/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१,दि.२६/४/२०२३
११) मनपा ठराव क्र.६७,दि.२०/६/२०२३
१२) मनपा ठराव क्र.१२९,दि.२५/८/२०२३
१३) मनपा ठराव क्र.२०५,दि.२०/१०/२०२३

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम –२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी –२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन –२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती –१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती –७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | |

( टीप :- पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२७९, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.३७०**

संदर्भ :- १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.महेश वाबळे यांचे दि.११/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८३,दि.११/१/२०२२
३) मनपा ठराव क्र.८०४, दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२५, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७०, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२६९, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७०, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.२, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६८, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३०, दि.२५/८/२०२३
११) नपा ठराव क्र.२०६, दि.२०/१०/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

सॅन अ‍ॅड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला ६० फुट X ३० फुट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्यायावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८०, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.३७१**

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती. लता राजगुरू, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.५, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२६, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७१, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७०, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७१, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.३, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६९, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३१, दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०७,दि.२०/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

PMPML च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८१, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.३७२**

संदर्भ :- १) मा. सौ. वर्षा तापकीर, मा. विशाल तांबे, मा.सौ. मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२

३) मनपा ठराव क्र.६, दि.११/४/२०२२

४) मनपा ठराव क्र.१२७, दि.२५/७/२०२२

५) मनपा ठराव क्र.१७२, दि.२३/९/२०२२

६) मनपा ठराव क्र.२७१, दि.१/१२/२०२२

७) मनपा ठराव क्र.३७२, दि.१७/२/२०२३

८) मनपा ठराव क्र.४, दि.२६/४/२०२३

९) मनपा ठराव क्र.७०,दि.२०/६/२०२३

१०) मनपा ठराव क्र.१३२,दि.२५/८/२०२३

११) मनपा ठराव क्र.२०८,दि.२०/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८२, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.३७३**

संदर्भ :- १) मा. सौ. उज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२

३) मनपा ठराव क्र.७, दि.११/४/२०२२

४) मनपा ठराव क्र.१२८, दि.२५/७/२०२२

५) मनपा ठराव क्र.१७३, दि.२३/९/२०२२

६) मनपा ठराव क्र.२७२, दि.१/१२/२०२२

७) मनपा ठराव क्र.३७३, दि.१७/२/२०२३

८) मनपा ठराव क्र.५, दि.२६/४/२०२३

९) मनपा ठराव क्र.७१, दि.२०/६/२०२३

१०) मनपा ठराव क्र.१३३, दि.२५/८/२०२३

११) मनपा ठराव क्र.२०९, दि.२०/१०/२०२३

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खैबर व बोलन खिंडीतून सुमारे २००० वर्षे अनेक परकीय आक्रमकांनी आपल्या देशावर वारंवार आक्रमणे करून आपल्या देशाचे लचके तोडले होते. अशा आक्रांतांपैकी एक अफगाणिस्थानाचा बादशाह अहमदशाह अब्दाली सन १७६० साली पाचव्यांदा आक्रमण करून आला. तेव्हा अशा पाशवी आक्रमणाचा बिमोड करून देशाचे संरक्षण करण्याच्या हेतूने पुण्यातील शनिवार वाडा येथून सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वात मराठा सैन्याने उत्तरेकडे कूच केले. दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी हरियाणा मधील पानिपतावर दोन्ही सैन्यांमध्ये तुंबळ युद्ध झाले. या पानिपताच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्यांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली व धगधगत्या राष्ट्रयज्ञकुंडात आपल्या देशासाठी आपल्या प्राणांच्या सुमारे सव्वा लाख आहुत्या दिल्या. मराठा सैन्यांनी आपल्या शौर्याने परकीय आक्रमकांना जोरदार तडाखा देऊन हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खिंडीतून येणारी सततची आक्रमणे थांबविली. खैबर व बोलन खिंडी आपल्या रक्तामांसाच्या चिखलाने लिंपून कायमच्या बंद केल्या आणि हिंदुस्थानावर चालून येणारा आक्रमक शत्रूंच्या वाटा रोखल्या. मराठे उत्तरेत गेले ते मातृभूमीच्या सीमा निश्चित करण्यासाठी, प्राणपणाने लढले ते हिंदुस्थानाच्या भौगोलिक सीमा राखण्यासाठी आणि लढता लढता हौतात्म्य पावले ते श्रीशिवछत्रपतींनी दाखविलेल्या स्वप्नपूर्तीसाठी आणि स्वाभिमान रक्षणासाठी.

पानिपतावरील पराक्रमी योद्ध्यांना व हौतात्म्यांना मानवंदना म्हणून महाराष्ट्रातील तरूण हरियाणा मधील ''कालाआम पानिपत रणभूमी स्मारक'' येथून शौर्य ज्योत प्रज्वलित करून पानिपत ते पुणे मार्गे दिल्ली, आगरा, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धार या मार्गे अखंडितपणे पायी धावत घेऊन येणार आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाला साजेसे असे शूर

हुतात्म्यांचे चिरस्थायी स्मारक पुण्यामध्ये व्हावे या उद्देशाने हि शौर्य ज्योत हौतात्म्य भूमी पानिपता वरून तत्कालीन राजकीय राजधानी पुणे येथे आणली जाईल. दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८३,
दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.३७४**

संदर्भ :- १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.८, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२९, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७४, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७३, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७४, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.६, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७२,दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३४,दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२१०, दि.२०/१०/२०२३

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१-२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)
( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८४,
दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.३७५**

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/३३१,
दि.२९/८/२०१९.
२) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/५८,
दि.२९/४/२०२०.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २२०३, दि.१/०२/२०२२ रोजीचे पत्र.
४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडीलआ.क्र. एफएमओ/४६०, दि.२७/७/२०२० रोजीचे पत्र.
५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.३८४, दि. १०/७/२०२२ रोजीचे पत्र.
६) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४००, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०३, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
८) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०४, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
९) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६७, दि. २९/९/२०२० रोजीचे पत्र.
१०) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६९, दि. ३०/९/२०२० रोजीचे पत्र.
११) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८२, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१२) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८३, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१३) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०५, दि. ८/१०/२०२० रोजीचे पत्र.
१४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०९, दि. ९/१०/२०२० रोजीचे पत्र.
१५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७२७, दि. ३/१२/२०२० रोजीचे पत्र.
१६) महात्मा फुले मंडई क र्यालयाकडील आ.क्र.१७४३, दि. २४/३/२०२२ रोजीचे पत्र.
१७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७४२, दि. २४/०३/२०२२ रोजीचे पत्र.
१८) दि. ३०/०९/२०२० व दि. ६/१०/२०२२ मा.अति.महापालिका आयुक्त (वि) व

मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार.

१९) दि. १०/०७/२०२१ रोजी मा. महापालिका आयुक्त यांचे तोंडी आदेशानुसार.

२०) विधी विभाग, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र.१३३९, दि.१३/६/२०२२.

२१) मालमत्ता व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र. २१७९, दि.२३/०६/२०२२.

२२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मंडई/११ दि.१२/४/२०२३ चे पत्र.

२३) स्थायी समिती ठराव क्र.५२,दि.१७/४/२०२३

२४) मनपा ठराव क्र.४९, दि.२६/४/२०२३

२५) मनपा ठराव क्र.५१, दि.३०/५/२०२३

२६) मनपा ठराव क्र.७३, दि.२०/६/२०२३

२७) मनपा ठराव क्र.१३५, दि.२५/८/२०२३

२८) मनपा ठराव क्र.२११,दि.२०/१०/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मंडई विभागाकडील गाळ्यांचा करारनामा व नवीन मुल्यांकना नुसार भाडे वाढ करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) कोरोना काळामध्ये मंडई अथवा इतर सार्वजनिक ठिकाणावर संचार बंदी असल्याने व पर्यायाने व्यवसाय बंद असल्याने मंडई विभागाकडून पुणे शहरातील सर्व मंडई मधील गाळेधारकांचे त्यांचे मागणीनुसार दि.०१/४/२०२० ते ३१/३/२०२१ अखेर, भाडे माफ करणेस होईल तसेच मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद संदर्भ क्र.०२ चे ठरावान्वये दि.०१/४/२०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने भाडे आकारणी करणेस.

२) नवीन मुल्यांकना नुसार मंडई विभागाकडे मा. मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त झालेल ेगाळ्यांचे मासिक दर हे आता असलेल्या मासिक भाडे रकमेच्या अनुक्रमे ५,६,७ व ८ पटीने (टप्प्याने) असे खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे ४ वर्ष करणेस.

| अ.क्र. | वर्ष | भाडेवाढपट |
|---|---|---|
| १ | एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ | ५ |
| २ | एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ | ६ |
| ३ | एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ | ७ |
| ४ | एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ | ८ |

३) सन २०२१–२०२२ पासून पुढे ३० वर्ष मुदतीचा करारनामा पुणे शहरातील सर्व मंडई मधील सर्व गाळाधारकांसमवेत करणेस.

४) मुंबई क्राफर्ड मार्केटच्या धर्तीवर पुणे शहरातील सर्व मंडई मधील सर्व गाळ्यांचे बांधकाम व गाळा दुरूस्ती करणेस.

५) मंडई नियमावलीनुसार गाळेधारकांना भाजी विक्री व्यवसाय व्यतिरिक्त इतर व्यवसाय करणे तसेच व्यवसायात बदल करणेबाबत परवानगी देणेस.

६) सन एप्रिल २०२५ पासून नव्याने मुल्यांकन करून भाडे निश्चित करून आकारणी करणेबाबत.

७) सन एप्रिल २०२५ साठी निश्चित झालेल्या भाडेदरात पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८५, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**<u>विषय क्र.३७६</u>**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक केंद्र /१३६७, दि.२३/१/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३३, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील पुणे पेठ शिवाजीनगर पुणे मनपा शाळा क्र.१४ लालबहादूर शास्त्री शाळेच्या आवारातील एव्हिएशन गॅलरी प्रकल्पाकरिता शाळेच्या दर्शनी भागातील इमारती मधील तळमजला +३ मजले लिव्ह ॲण्ड लायसन्स निविदा पध्दतीने ३ वर्षे कालावधी करिता चालविणेस देणेकामी निविदा मागविली असता महालक्ष्मी एव्हिएशन प्रा.लि.यांची एकच निविदा आली असल्याने त्यांनी देऊ केलेली रक्कम रू.१,०१,३७०/- ही पुणे मनपाने निर्धारित केलेल्या र.रू.९३,०००/- पेक्षा र.रू.८,३७०/- ने जास्त असल्याने त्यांचेकडून र.रू.१,०१,३७०/- प्रति महिने प्रमाणे मान्य करणेस व कामाचा मक्ता प्रत्यक्ष कार्यवाहीचे दिनांकापासून ३ वर्षासाठी देणेस, निविदाधारकास वर्क ऑर्डर देणेस व

निविदाधारक महालक्ष्मी एन्व्हिशन प्रा.लि.यांच्याबरोबर योग्य तो करारनामा करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३७७**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१३६९, दि.२३/१/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३५, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे शहरातील विविध क्रीडा संकुलाच्या स्थापत्यविषयक दुरूस्तीच्या कामांसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने र.रू.३५० लक्ष उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिषक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक,भवन रचना विभाग<br>१) भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय,<br>बजेट कोड-CE17A 242/SJ6-93 | ८० लक्ष | --- |
| २) बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयासाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधणे<br>बजेट कोड-CE11A 129/J1-18 | ५० लक्ष | --- |
| ३) प्रभाग क्र.३६ अण्णाभाऊ सभागृहामागील जलतरण तलावाचे काम पूर्ण करणे बजेट कोड-CE27A 241/J24-103 | ५० लक्ष | --- |
| ४) सुस गाव मधील पुणे मनपा शाळा डागडुजी करणे, रंगकाम करणे, खेळाचे मैदान बनविणे, कॉम्पुटर बसविणे बजेट कोड-CE12A 422/J2-61 | ३५ लक्ष | --- |
| ५) प्र.क्र.७ स्वामी विवेकानंद शाळेमधील ई-लायब्ररीच्या अर्धवट राहिलेल्या काम पूर्णत्वासाठी बजेट कोड- CE12A 422/J2-62 | २० लक्ष | --- |
| ६) प्र.क्र.२५ वानवडी स्मशान भूमी मध्ये दशक्रिया विधी शेड बांधणे.<br>बजेट कोड- CE17A 227/J12-46 | १५ लक्ष | --- |
| ७) प्र.क्र.२५ मुस्लीम दफनभूमी(शिंदेछत्री) येथे नव्याने ड्रेनेज लाईन टाकणे बजेट कोड- CE17A 227/J12-47 | १० लक्ष | --- |
| ८) प्र.क्र.१९ रासकर मळा येथे विविध विकासाची कामे करणे.<br>बजेट कोड- CE22A 548/J10-99 | १० लक्ष | --- |
| ९) प्र.क्र.२५ आझादनगर येथील समाज मंदिरामध्ये अभ्यासिका व ई-लायब्ररी सुरू करणे. बजेट कोड- CE22A 704/J20-49 | १० लक्ष | --- |
| १०) पी.एम.सी.कॉलनी कसबा पेठ येथील जिमची दुरूस्ती व जिम साहित्य खरेदी करणे. बजेट कोड- CE22A 704/J20-56 | २५ लक्ष | --- |
| ११) कोंढवा खुर्द प्र.क्र.२७ स.न.४४ क्रीडागंणाची सीमाभिंत बांधणे.<br>बजेट कोड - CE27A 241/J24-81 | २० लक्ष | --- |
| १२) प्र.क्र.२१ चंचल मंडळ वसाहत येथे विरंगुळा केंद्र व अन्य कामे करणे.<br>बजेट कोड - CE22A 704/J20-55 | २५ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे -** | | |
| भवन विभागाकडील कामे<br>१) राजमाता जिजाऊ क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव, श्रावस्तीनगर घोरपडी | --- | ६० लक्ष |
| २) शनिवार पेठ येथील न.वि.गाडगीळ जलतरण तलाव येथे स्थापत्य दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २० लक्ष |
| ३) बॅडमिंटन हॉल स.न.१४ कर्वेनगर येथे दुरूस्ती विषयक कामे करणे | --- | ३८ लक्ष |
| ४) पुणे पेठ शिवाजीनगर प्लॉट नं.८९ येथील जलतरण तलाव व व्यायामशाळा येथील दुरूस्ती विषयक व तदनुषंगीक कामे करणे. | --- | ६२.३६ लक्ष |
| ५) पुणे पेठ शिवाजीनगर येथील नांदे जलतरण तलाव येथे स्थापत्यविषयक दुरूस्ती व तदनुषंगिक कामे करणे. | --- | ४० लक्ष |
| ६) विठ्ठलराव तुपे क्रीडा संकुलातील जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल येथे विविध स्थापत्य विषयक व तदनुषंगिक कामे करणे. | --- | ५० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ७) कै.रामचंद्र (आप्पा ) बनकर क्रीडा संकुलामध्ये विविध स्थापत्य विषयक कामे करणे. | --- | ४५ लक्ष |
| ८) पुणे महानगरपालिकेच्या कै.शारदाबाई गोविंदराव पवार क्रीडा संकुल पदमावती, येथे विविध कामे करणे. | --- | ९.६४ लक्ष |
| ९) पुणे महानगरपालिकेचे योगगुरू रामदेवबाबा क्रीडा संकुल तळजाई, सहकारनगर येथे स्थापत्यविषयक कामे करणे | --- | २५ लक्ष |

**विषय क्र.३७८**

संदर्भ :- १) माजी महापौर, श्री.मुरलीधर मोहोळ यांचे भवन विभागाकडील आ.क्र.२३८२,दि.१४/०६/२०२३ चे पत्र.

२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१३७०,दि.२३/०१/२०२४ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३६, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

चांदणी चौक सुशोभिकरण करणे या अंतर्गत हिंदवी स्वराज्य निर्मिती शिल्प उभारणे, या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२(ब) अन्वये र.रू. ७,८१,५९,८४०=०० अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाचे दायित्व स्विकारणेस मान्यता देण्यात यावी अशी, मा. मुख्यसभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३७९**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/१३७१, दि.२३/१/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३७, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

परिमंडळ विभाग कार्यालय क्र.१ अंतर्गत येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालयास खाली नमूद नवीन कामाकरीता र.रू.४० लक्ष वर्गीकरणांने तरतूद उपलब्ध करून देणेकामी मान्यता देण्यात यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक, पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणी बजेट कोड-ZE16B 102/D2-369 | ४० लक्ष रू. | --- |
| **नवीन सुचविलेली कामे -** | | |
| परिमंडळ क्र. १<br>१) प्रभाग क्र.२ मध्ये खंडागळे यांच्या शेजारील गल्लीमध्ये ड्रेनेज लाईन व कॉक्रीट करणे. | --- | १० लक्ष रू. |
| २)प्रभाग क्र.२ मध्ये महाराष्ट्र हौसिंग बोर्ड मधील एम टाईप मध्ये ड्रेनेज लाईन बदलणे व कॉक्रीट करणे. | --- | १० लक्ष रू. |
| ३)प्र.क्र.२ मध्ये चंद्रमानगर व मोझे नगर येथे ड्रेनेज लाईन व कॉक्रीट करणे. | --- | १० लक्ष रू. |
| ४)प्र.क्र.२ मधील नागपूर चाळी मधील बुध्द विहार समोरील गल्लीमध्ये ड्रेनेज लाईन बदलणे व कॉक्रीट करणे. | --- | १० लक्ष रू. |

**विषय क्र.३८०**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१३७२, दि.२३/१/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३८, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिका पथ विभागाकडील विविध विकास कामे व तदनुषंगिक कामांकरिता र.रू.३०० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करून मिळणेस मान्यता देण्यात यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक,मुख्य अभियंता (पथ कार्यालय)<br>१) बजेट कोड- CE20A 884/A10-57 पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व हद्दीवर फलक तयार करून बसविणे. | २०० लक्ष | --- |

| | | |
|---|---|---|
| २) बजेट कोड–CE20A 884/A10-92 तळजाई परिसरात रस्ते व सुरक्षा विषयक कामे करणे. | ५० लक्ष | --- |
| ३) बजेट कोड–CE20A 1249/A6-586 प्र.क्र.३८ मधील कात्रज गुजरवाडी फाटा ते वरखडे नगर चौक १८ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ५० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे –** | | |
| मुख्य अभियंता (पथ कार्यालय)<br>पुणे महानगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाला त्याच्या हद्दीमधील रस्ता दुरूस्ती साठी प्रत्येकी २० लक्ष रूपये | --- | ३०० लक्ष |

**विषय क्र.३८१**

संदर्भ :- १) मा.महापालिका.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/१३७३, दि.२३/१/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३९, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे बजेट कोड–ZE16B 102/D2-369 या कामासाठी उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून कसबा मतदार संघातील विकास कामांसाठी र.रू. ६४ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करून मिळणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्यसभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३–२४ चे अंदाजपत्रक ,मलनिःसारण देखभाल व दुरूस्ती विभाग<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे बजेट कोड–ZE16B 102/D2-369 | ६४ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे –** | | |
| परिमंडळ क्र. ५<br>१) कसबा मतदार संघ, गणेश पेठ बेल्लार गल्ली परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १४ लक्ष |
| २) कसबा मतदार संघ गणेश पेठ शौचालयासमोर ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १७ लक्ष |
| ३) कसबा मतदार संघ, रविवार पेठ, बंदिवान मारूती तिन्ही गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १९ लक्ष |
| ४) कसबा मतदार संघ, रविवार पेठ, मिरा दातार दर्ग्याच्या पाठीमागच्या गल्लीत ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १४ लक्ष |

**विषय क्र.३८२**

संदर्भ :- १) मुख्य सभा ठराव क्र. ९८, दि. २१/०५/१९९६
२) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र. वेतन–२०२३/प्र.क्र.१३/सेवा–३,दि.२८/०६/२०२३
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३७४,दि.२३/०१/२०२४ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४०, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करणे व निवृत्तीवेतनविषयक लाभ देणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यास १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करणेबाबत वैयक्तिक अर्ज शेवटचे वेतनाचे खात्याकडे सादर करणे आवश्यक राहील. एकत्रितपणे केलेल्या अर्जांचा विचार करण्यात येऊ नये.

२) जे महापालिका कर्मचारी दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत आणि ज्यांनी मागील १२ महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे, अशाच सेवानिवृत्त सेवकांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. अर्हताकारी सेवा म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ३० ते ५८ नुसार निवृत्तिवेतनासाठी विचारात घेतली जाणारी सेवा होय.

३) अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भांकीत शासन परिपत्रकानुसार व मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या वर

नमूद आदेशात नमूद केलेप्रमाणे संबंधित सेवकाचे सेवानिवृत्तिविषयक लाभ अनुज्ञेय करावेत. सदर लाभ सुधारित करण्यात आल्यानंतर त्यांनी अर्ज दाखल केलेल्या दिनांकांच्या मागील ३ वर्षांची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तिचा दिनांक यापैकी जे कमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी.

४) मे. उच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करीत असलेल्या कोणत्याही सेवानिवृत्ताचा अर्ज फेटाळण्यात येऊ नये.

५) सदर खात्याने संबंधित सेवानिवृत्त सेवकांची प्रकरणे माहे जुलै महिन्याची काल्पनिक वेतनवाढ अनुज्ञेय करून खातेस्तरावर खात्री करून प्रकरण सेवानिवृत्त सेवकांच्या मूळ अर्जासह पेन्शन विभागामार्फत मुख्य लेखापरिक्षक विभागाकडे मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक राहील.

६) सदर लाभ देतेवेळी महापालिकेस येणे रकमा नसलेबाबत खात्री करावी. येणे रकमा असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३२ नुसार प्रथमतः उपदानाच्या रकमेतून तसेच आवश्यकतेनुसार नियम १३४, १३४अ नुसार सुधारित निवृत्तिवेतनापोटी देय थकबाकीच्या रकमेतून समायोजित करावयाच्या आहेत.

७) उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेकरीता आवश्यक नवीन संगणक प्रणाली अथवा सध्याचे संगणक प्रणालीमध्ये दुरूस्ती माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून करणेत यावी.

**<u>विषय क्र.३८३</u>**

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१३७७, दि. २३/०१/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४२, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

बावधन खुर्द स.नं. १९ येथील आरक्षित जागेवर प्लेग्राऊंडची (पी.जी.१२) वर एडव्हेंचर पार्क व बालभवनची कामे पूर्ण करणेसाठी खालीलप्रमाणे र.रू.५० लक्ष तरतूद वर्गीकरणाने उपलब्ध करून मिळणेस मान्यता देण्यात यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक,भवन रचना विभाग<br>बजेटकोड -CE28A160/SJ16-517 ,कोथरूड येथे कला अकादमी | र.रू. ५० लक्ष | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>भवन रचना विभाग<br>बावधन खुर्द स.नं. १९ येथील आरक्षित जागेवर प्लेग्राऊंडची (पी.जी.१२) वर एडव्हेंचर पार्क व बालभवनची कामे पूर्ण करणे | --- | र.रू. ५० लक्ष |

**<u>विषय क्र.३८४</u>**

संदर्भ :- १) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) कार्यालय इतिवृत्त जावक क्र. २३६३, दि. २६/०७/२०२३.
३) मा. उप आयुक्त मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील पत्र जावक क्र. विशेष-३,दि. २९/०७/२०२३.
४) मे. जगन्नाथ मंडप डेकोरेटर, बालाजी मंडप डेकोरेटर, रंगनाथ मंडप डेकोरेटर यांना या कार्यालयाकडून जावक क्र. विशेष-३३९२, दि. ३१/०७/२०२३ अन्वये देण्यात आलेले पत्र.
५) कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाकडील आ.क्र.५२२४,दि.३१/०७/२०२३ रोजीचे मे. जगन्नाथ मंडप डेकोरेटरची सिलबंद लिफाफ्यातील प्राप्त दरपत्र.
६) कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाकडील आ.क्र.५२२५,दि.३१/०७/२०२३ रोजीचे मे. बालाजी मंडप डेकोरेटरची सिलबंद लिफाफ्यातील प्राप्त दरपत्र.
७) कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाकडील आ.क्र. ५२२६, दि. ३१/०७/२०२३ रोजीचे मे. रंगनाथ मंडप डेकोरेटरची सिलबंद लिफाफ्यातील प्राप्त दरपत्र.
८) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/१३७९,दि.२३/०१/२०२४ चे पत्र.
९) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४३, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे दि.०१/०८/२०२३ रोजीच्या पुणे भेटीच्या निमित्त टिळक पुरस्कार, अण्णाभाऊ साठे जयंती व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दर्शन सोहळयासाठी कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मंडप व्यवस्था, बॅरेकेडींग, पार्किंग सुविधा व तदनुषंगिक कामे करणे मे. श्री. रंगनाथ एंटरप्रायजेस या एजन्सीकडून दि. ३१/०७/२०२३ रोजीपासून काम करून घेणेस पश्चात मान्यता व सदरचे कामाचे

बिल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अंतर्गत अदा करणेसाठी खालीलप्रमाणे सदर खर्चाचे प्रतिवृत्त मा. मुख्यसभेच्या निदर्शनास आणणेत यावे.

१) मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे दि. ०१/०८/२०२३ रोजीच्या पुणे भेटीच्या निमित्त टिळक पुरस्कार, अण्णाभाऊ साठे जयंती व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दर्शन सोहळयासाठी कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मंडप व्यवस्था, बॅरेकेडींग, पार्किंग सुविधा व तद्नुषंगिक कामे करणे कामी मे. श्री. रंगनाथ एंटरप्रायजेस या एजन्सी यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) नुसार निविदा न मागवता त्यांनी दिलेल्या दरानुसार दि. ३१/०७/२०२३ पासून काम करून घेणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेस.

२) मे/श्री.रंगनाथ एंटरप्रायजेस यांचेशी कामाचे पश्चात करार करणेस.

३) प्रस्तुत कामी सन २०२३–२४ चे अंदाजपत्रकातील सुसंगत बजेटवर अंदाजे र.रू.४६,८८,८२८.३८ + जी.एस.टी. र.रू.८,४३,९८९.१० असे एकूण र.रू.५५,३२,८१७.४९ लॉकींगने उपलब्ध करून मिळणेस.

**<u>विषय क्र.३८५</u>**

संदर्भ :- १) मुख्य लेखा व वित्त विभाग यांचेकडील जा.क्र. ३५०६, दि. २१/११/२०२३ चे इतिवृत्त
२) मलनिःसारण विभाग (प्रकल्प), पुणे महानगरपालिका यांचे ना–हरकत प्रमाणपत्र,दि.११/१२/२०२३
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/१३८० दि.२३/१/२०२४ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४४, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेजलाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे बजेट कोड–ZE16B 102/D2-369 या कामासाठी उपलब्ध असलेल्या ५०.०० कोटी तरतुदीमधून प्रभाग क्र.१५ व २९ मधील विकास कामांसाठी खालीलप्रमाणे र.रू.१०५.०० लक्ष वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्यसभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३–२०२४ चे अंदाजपत्रक,<br>मलनिःसारण देखभाल दुरूस्ती विभाग<br>मुख्य लेखा व वित्त विभाग यांचेकडील जा.क्र. ३५०६, दि. २१/११/२०२३ चे इतिवृत्तमधील मान्य बजेटकोड –ZE16B102/D2-369<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावामध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. (मान्य तरतूद ५००० लक्ष) | र.रू. १०५ लक्ष | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम –</u>**<br>परिमंडळ क्र. ५<br>१) सदाशिव पेठ, शनिपार बसस्टॉप, कुमठेकर रोड, सेवासदन शाळा, गाय आळी स्वामी मंदिर, नागनाथ पार, सदाशिव पेठ मेहता पब्लिकेशन पुस्तक दुकान, माडीवाले कॉलनी, जनता डेअरी, नागनाथ पार चौक, गाय आळी, कुमठेकर रोड पोस्ट ऑफिस, खालकर तालीमजवळ (अंदाजे लांबी ३५० र.मी., ४५० मि.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकणे) | --- | र.रू.२५ लक्ष |
| २) घरांक १६२, नारायण पेठ केळकर रोड, पवार वाड्याजवळ, नारायण पेठ शकुनी मारूती, हुजूरपागा शाळेजवळ, कासट पार, केळकर रोड, सिताफळ बागजवळ, कबीर बागजवळ (अंदाजे लांबी ३५० र.मी., ४५० मि.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकणे) | --- | र.रू.२० लक्ष |
| ३) सुभाषनगर गल्ली क्र. ३,९,१ (अंदाजे लांबी ३५० र.मी., ४५० मि.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकणे) | --- | र.रू.२० लक्ष |
| ४) गांजवे चौक ते नवी पेठ विठ्ठल मंदिर, लोकमान्य वाचनालय ते चिन्मय हॉस्टिपल, मा. अंकुश काकडे यांचे घराजवळ,दामले आरोग्य कोठी ते नवी पेठ विठ्ठल मंदिर (अंदाजे लांबी ३५० र.मी., ४५० मि.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकणे) | --- | र.रू.२० लक्ष |
| ५) बादशाह बिल्डिंग ते शक्ती स्पोर्टस्, गोपाळ गायन रोड, सणस ग्राऊंड समोरील कावेरी हॉटेल ते ना.सी. फडके चौक, कल्पना विश्व हॉटेल, न्यू इंग्लिश स्कूल | | |

| | | |
|---|---|---|
| मासेआळी ते शास्त्री रोड, टिळक रोड एस.पी. कॉलेज ते महाराष्ट्र इलेक्ट्रिकल दुकान (अंदाजे लांबी ३५० र.मी., ४५० मि.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप टाकणे) | --- | र.रू.२० लक्ष |

**विषय क्र.३८६**

संदर्भ :- १) मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये दि.१२/०८/२०२३ रोजी झालेली बैठक.

२) मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचेकडे दि.२०/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

३) पुर्वगणनपत्रक

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१३८१, दि. २३/१/२०२४ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४५, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

गणेशखिंड रस्ता संचेती ते विद्यापीठ दरम्यानचा ४५ मी. डी.पी. रस्ता रुंदीकरण करणे या कामाचे खर्चाचे दायित्व पत्करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब नुसार खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) गणेशखिंड रस्ता संचेती ते विद्यापीठ दरम्यानचा ४५ मी. डी.पी. रस्ता रुंदीकरण करणे या कामाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब नुसार र.रू. ३८३९ लक्ष खर्चाचे दायित्व स्विकारणेस.

२) गणेशखिंड रस्त्याचे काम सलगरित्या पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून एकत्रित निविदा राबविणे योग्य ठरत असल्याने, प्रस्तुत कामासाठी मा. मुख्य सभेची उर्वरीत तरतुदीकरीता महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम कलम ७२ ब अन्वये मान्यता मिळेल, या भरवशावर कामाची पुर्वगणनपत्रक मान्यता व निविदा प्रक्रिया राबविणेस.

**विषय क्र.३८७**

संदर्भ :- १)मा.महाराष्ट्र विधानसभा सदस्य श्री.संग्राम थोपटे,भोर,जि.पुणे यांचे आवक क्र. ९०२३,दि. ६/१०/२०२३ चे पत्र.

२) मा. वित्तीय समिती यांचा इतिवृत्त जा. क्र. ३१६४, दि. २३/१०/२०२३ रोजी मिळालेली मान्यता.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/१३८२, दि. २३/१/२०२४ चे पत्र

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४६, दि.३१/१/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

मौजे सुस पारखे वस्ती ते गणेश मंदिर सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे, या कामासाठी र.रू. २५ लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्यसभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मा. अधिक्षक अभियंता(भवन)सन २०२३-२४ मध्ये उपलब्ध केलेली तरतुद,भारत रत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय,बजेट कोड-CE17A242/SJ6-93 र.रु.१३७ कोटी | २५.०० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे-** | | |
| औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालय,मौजे सुस पारखेवस्ती ते गणेश मंदिर सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | -- | २५.०० लक्ष |

**विषय क्र.३८८**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सांस्कृतिक/१४०५, दि. २९/१/२०२४ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४७९, दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ औंध स.नं.१२५+१५३, पंडित भीमसेन जोशी कला मंदिर,औंध येथील वाहनतळ,३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागविली असता जेट सर्व्हिसेस यांची एकच निविदा आली असून, त्यांनी देवू केलेली वार्षिक भाडे र.रू.९४,३४८/- ही पुणे मनपाने निर्धारित केलेल्या र.रू.९०,७२०/- या दरापेक्षा ३,६२८/- ने जास्त असल्याने त्यांचेकडून निविदा र.रू.९४,३४८/- मान्य करणेस व कामाचा मक्ता प्रत्यक्ष कारवाईच्या दिनांकापासून ३ वर्षासाठी चालविणेस देणेस निविदाधारकांस वर्क ऑर्डर देणेस, निविदाधारक जेट सर्व्हिसेस यांच्याबरोबर योग्य तो करारनामा करणेस मान्यता देण्यात यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३८९**

संदर्भ :- १) कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील जा.क्र.टीजीओ/३१५४ ते टीजीओ/४४२७, दि.३०/१०/२०२३ रोजीचे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५४६,दि.१९/८/२०२२ रोजीचा ठराव
३) कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील जा.क्र.टीजीओ/४५५१,दि.१५/१२/२०२२ रोजीचे पत्र
४) कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील जा.क्र.टीजीओ/४७३३,दि.२६/१२/२०२३ रोजीचे पत्र
५) मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्र.६/७५१,दि.२७/१२/२०२३ रोजीचा ठराव
६) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टॅक्स/१४१६,दि.३०/१/२०२४ चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४९०, दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

लिलाव प्रक्रिया राबविणे करिता मिळकतींचे मुल्यांकनासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) या नियमाच्या अधीन राहून Goverment Valuator यांच्या नेमणूकीबाबत खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) लिलाव प्रक्रियेत असलेले थकबाकीदार यांच्या मिळकतीचे मुल्यांकन करणेकरिता श्री.प्रमोद बेलसरे Government valuator यांची नेमणूक करणेस.

२)सद्यस्थितीतील १८४ मिळकती व भविष्यात चालू आर्थिक वर्षात येणाऱ्या लिलाव प्रक्रियेतील मिळकतींचे मुल्यांकन देखील श्री.प्रमोद बेलसरे Government valuator यांचेकडून करणेस.

३)विषयांकित नमूद केलेल्या मूल्यांकनाच्या कामासाठी संदर्भ क्र.५ चे मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/७५१ दि.२७/१२/२०२३ अन्वये Wealth tax rules 2009 notification No.15/2009 dated 30/1/2009 नुसार फी देणेस.

४) सदर Valuator यांचेकडून लिलाव प्रक्रियेत असलेले थकबाकीदार यांच्या मिळकतींचे मुल्यांकन करून प्रमाणित केल्याचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावर त्यांना द्यावयाचा मोबदला छ. कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांचे कार्यालय-पुणे मनपा हद्दीतील मिळकतींचे GIS करणे – RE11G113 या अर्थशिर्षकावरून खर्ची टाकणेस.

**विषय क्र.३९०**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१४२८, दि.३१/१/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०१,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

Construction and Demolition Waste ( C&D) Processing & Management Plant of 200 TPD on PPP Basis / On Design-Built Finance Operate Transfer) DBFOT) Model. करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.आदित्य वेस्ट पेपर सप्लायर्स इंडस्ट्रीज (जे.व्ही.) त्यांचेकडून र.रू.३५२/- प्रति.मे.टन.(तडजोडीने) अधिक ५ % वार्षिक दरवाढ याप्रमाणे टेंडर स्पेसिफिकेशन व टेंडर अटी व शर्तीप्रमाणे १५ वर्षे मुदतीपर्यंत काम करून घेणेस, होणाऱ्या कामाची देयके अदा करणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३९१**

संदर्भ :- १) पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्था यांचे दि.२२/५/२०२३ चे नव्याने करारनामा पुनश्च: पुढील १० वर्षे करिता मुदतवाढ मिळणेबाबतचे आमच्या खात्याकडील आ.क्र.ईओ/५१०दि.२६/५/२०२३ चे पत्र.
२) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांचेकडील ठराव क्र.६/१५९,दि.२/६/२०२३ चे ५ वर्षे मुदतवाढीचा ठराव
३) मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक व तांत्रिक विभाग, पुणे महानगरपालिका कार्यालयाकडील आ.क्र.१०३१, दि.१७/७/२०२३ चे श्री.उल्हास उर्फ आबा वसंतरा बागुल माजी सभासद, पुणे महानगरपालिका यांचे पत्र.
४) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग पुणे महानगरपालिका जा.क्र.७८५, दि.१२/७/२०२२ चे मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग यांना पाठविलेले इतिवृत्त.
५) मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे.१ यांचे कार्यालयाकडील जा.क्र.शिउसं/पुवि/उमाशि/ ४०१/२०२३/५९५४, दि.८/६/२०२३ चे ईमेल द्वारे या कार्यालयाकडील आ.क्र.ई.ओ.आय/१४५०, दि.२४/८/२०२३ चे पत्र.
६) मा.अति.महा.आयुक्त ( ज ) कार्यालयाकडील जा.क्र.६६९७,दि.२८/८/२०२३ चे निर्देश

७) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग पुणे मनपा जा.क्र.९४५,दि.५/९/२०२३ चे मा.मुख्य विधी अधिकारी यांना अभिप्रायासाठी पाठविलेले पत्र.
८) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग पुणे मनपा जा.क्र.९८७,दि.११/९/२०२३ ने राजीव गांधी अकॅडमी ऑफ ई–लर्निंग जुनियर कॉलेज येथील पेस एज्यूकेशनल ट्रस्टला पाठविलेले पत्र.
९) विधी विभाग, पुणे मनपा या कार्यालयाकडील जा.क्र.३४४७,दि.६/१०/२०२३ चा अभिप्राय
१०) पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्था, राजीव गांधी अकॅडमी ऑफ ईलर्निंग जुनियर कॉलेज यांचे इ.११ वी व १२ वी ची शैक्षणिक वर्ष सन २०२२–२३ व सन २०२३–२४ ची प्रवेशित विद्यार्थ्यांची माहितीबाबतचे खात्याकडील आ.क्र.१७७२,दि.१५/९/२०२३ चे पत्र.
११) पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्था, राजीव गांधी अकॅडमी ऑफ ईलर्निंग जुनियर कॉलेज यांचे इ.११ वी व १२ वी ची शैक्षणिक वर्ष सन २०२२–२३ व सन २०२३–२४ ची प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अद्ययावत माहितीबाबतचे खात्याकडील आ.क्र.२०६८,दि.१६/१०/२०२३ चे पत्र.
१२) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका जा.क्र.११९६,दि.१८/१०/२०२३ चे मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्थेस मुदत वाढ रद्द करणेबाबतचे निवेदन.
१३) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक /१४२९, दि.३१/१/२०२४ चे पत्र.
१४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०२,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी ॲकडमी ऑफ ई–लर्निंग स्कूल, सहकारनगर, पुणे येथील इ.११ वी व इ.१२ वी. शास्त्र शाखेकडील द्विलक्षी अभ्यासक्रमाचे वर्ग पेस एज्यूकेशनल ट्रस्ट या संस्थेस ५ वर्षे मुदतीसाठी चालविण्यास देण्यात आलेल्या मुदतवाढीस व त्याप्रमाणे पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्थेशी करारनामा करणेसाठी खालील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाची अट र.रू.१ लाख ऐवजी र.रू.३ लाख एवढी करण्यात यावी.
२) कराराचे उल्लंघन करून अनियमितता झाल्यास पेस एज्यूकेशनल ट्रस्ट या संस्थेस प्रती विद्यार्थी र.रू.१०,०००/– प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
३) २५ टक्के पुणे मनपा शाळेकडील विद्यार्थी व २५ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी अशा प्रकारे तरतूद करण्यात यावी, हे प्रवेश मोफत राहतील.उर्वरित ५० टक्के विद्यार्थ्याचे शासन नियमानुसार शुल्क आकारून पेस एज्यूकेशनल ट्रस्ट या संस्था प्रवेश देईल.
४) सर्व प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावेत.
५) लाईट बिल, इंटरनेट सुविधांचे व तत्सम सुविधांची बिले, तसेच इमारतीचे देखभाल दुरूस्तीचा खर्च पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्थेने करावा.

वरील प्रकारचे बदल करारात करण्यात येवून राजीव गांधी ॲकेडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल , सहकारनगर ,पुणे येथील इ.११ वी व इ.१२ वी.शास्त्र शाखेकडील द्विलक्षी अभ्यासक्रमाचे वर्ग पेस एज्यूकेशनल ट्रस्ट या संस्थेस मा.महा.आयुक्त पुणे मनपा यांचेकडील ठ.क्र.६/१५९,दि.२/६/२०२३ च्या मान्यतेने ५ वर्षे मुदतीसाठी चालविण्यास देण्यात आलेल्या मुदतवाढीस व त्याप्रमाणे पेस एज्यूकेशनल ट्रस्ट संस्थेशी करारनामा करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.३९२</u>**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/१४४०, दि.५/२/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५११,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपा हद्दीतील ड्रेनेज लाईन्सची साफसफाई यंत्राच्या सहाय्याने करणे या कामाकरिता कमी पडणारी रक्कम रूपये २.५० कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मोटार वाहन विभाग<br>क्षेत्रीय कार्यालय, अतिक्रमण कार्यालयाकडे कार्यरत असणारी सरसी आयुर्मान संपलेली युटीलिटी संवर्गातील वाहने निरस्त करून नवीन वाहने खरेदी करणे. | | |

| | | |
|---|---|---|
| बजेट कोड FE17A249 | २.५० कोटी | ---ा |
| नविन सुचविलेले काम - | | |
| पुणे शहरातील ड्रेनेज लाईन्स जेटिंग मशिनच्या सहाय्याने साफ करणे.<br>बजेट कोड XE23A111 | --- | २.५० कोटी |

विषय क्रमांक :- ३९३

संदर्भ :- १) मे.महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/ नवि-२२, दि.३०/६/२०२१ रोजीची अधिसूचना.
२) कर आकारणी व कर संकलन कार्यालय जा.क्र.टीजीओ/४६६०,दि.२०/१२/२०२३ चे पत्र.
३) मुख्य अभियंता कार्यालय ( पाणी पुरवठा ) जा.क्र.८७६१,दि.१२/१/२०२४ चे पत्र.
४) मा.महा.आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/कर आकारणी/१४४१,दि.१/२/२०२४ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१२, दि.५/२/२०२४

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी निश्चित केलेले करमणूक कर व मिळकतकराचे दर सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी कोणतेही दरवाढ न करता मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्टामध्ये (परिशिष्ट-अ, परिशिष्ट- ब ) नुसार कायम ठेवण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## कर आकारणी व कर संकलन : मिळकतकर विभाग

## परिशिष्ट -'अ' (A)

(१) करमणूक कर (थिएटर टॅक्स) :-

| तपशिल | प्रतीखेळ/प्रयोग यांचे दर | |
|---|---|---|
| | प्रचलित<br>२०२३-२४ | प्रस्तावित<br>२०२४-२५ |
| **(अ) चित्रपट** | | |
| १) ५०० पर्यंत बैठक व्यवस्था(सिट्स) असणा-या थिएटरला. | ६०/- | ६०/- |
| २) ५०० पेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला. | १००/- | १००/- |
| ३) वातानुकूल थिएटरला व मल्टिफ्लेक्स थिएटर | २००/- | २००/- |
| ४) मराठी सिनेमास | करमाफ | करमाफ |
| **(ब) नाटक** | १००/- | १००/- |
| **(क) सर्कस /कार्निव्हल/ पेट्स** | ३०/- | ३०/ |
| **(ड) तमाशा** | १०/- | १०/- |
| **(इ)** १.संगीत जलसे / शास्त्रीय संगीत उत्सव थिएटर मधील/व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास. | २००/- | २००/- |
| २.संगीत जलसे / शास्त्रीय संगीत उत्सव थिएटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास. | २००/- | २००/- |
| **(ई) कुस्त्या** | २०/- | २०/- |
| **(फ )** वरील खेरीज इतर प्रयोग (जर वेगवेगळे खेळ नसतील तर प्रत्येक दिवसास.) | ३०/- | ३०/- |

## परिशिष्ट -'ब'

(१) मिळकतकर(**Property Tax**) :-

(अे) सर्वसाधारण कर (**General Tax** ):-

(सदरचा कर मिळकतीच्या वार्षिक करपात्र रकमेवर आकारण्यात येतो.)

| वार्षिक करपात्र रक्कम रुपये | शहर/ग्रामिण विभाग प्रचलित सन २०२३-२४ दर शेकडा | शहर/ग्रामिण विभाग प्रस्तावित सन २०२४-२५ दर शेकडा |
|---|---|---|
| १ ते २,००० | १६.७५% | १६.७५% |
| २,००१ ते ५,००० | २३.७५% | २३.७५% |

| | | |
|---|---|---|
| ५,००१ ते २०,००० | ३२.७५% | ३२.७५% |
| २०,००१ ते पुढे | ४०.७५% | ४०.७५% |

## (बी) अग्निशामक कर (**Fire Cess**) :–

| वार्षिक करपात्र मूल्य | **शहर/ग्रामिण विभाग प्रचलित सन २०२३–२४ दर शेकडा** | **शहर/ग्रामिण विभाग प्रस्तावित सन २०२४–२५ दर शेकडा** |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | १.५०% | १.५०% |

**टिप:–**(१) महाराष्ट्र शासन क्र.आय.टी.पी.२००३ /सी.आर.:/३३११/आयएनडी–इंडस्ट्रीज एनर्जी आणि लेबर डिपार्टमेंट, मंत्रालय, मुंबई ३२, दि.१२ जुलै, २००३ महाराष्ट्र शासनाने आय.टी.आणि आय.टी.ई.एस. (INFORMATION TECHNOLOGY & INFORMATION TECHNOLOGY ENABLED SERVICES) योजना, २००३ मधील परिशिष्ट ४–६ SUPPORT OF IT & ITES UNITS BY URBAN LOCAL BODIES (b) या संस्थांना मिळकतीच्या आकारणी निवासी दराने करणेबाबत तसेच ज्या संस्थांमध्ये डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज (DIRECTORATE OF INDUSTRIES) महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र असलेल्या आय.टी.आणि आय.टी.ई.एस. संस्थांना दि.१.१०.२००३ पासून निवासी दराने आकारणी करणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०२७, दि.१७.१०.२००३ ने मान्यता देण्यात आली आहे. आयटी मिळकतीवरील शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या धोरणानुसार दि. ३१/३/२०१० अखेर सवलतीच्या वाजवी दराने करपात्र रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. शासन निर्णय संकीर्ण/२००८/जकात/सवलत/प्रक्र/०९/नवि/३४, दि.०४/०९/२००९ विचारात घेऊन दि. ०१/०४/२०१० पासून मान्य बिगरनिवासी दराने वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करण्यात आली आहे. मा.ए. एम खान , भा. प्र. से. प्रधान सचिव (उद्योग) संचनालय मुंबई यांचे अर्धशासकिय पत्र जा .क्र. अ. शा. प. क्र. आयटीपी २०१० /(४८७) उद्योग –२ दि. २९/०३/२०१० रोजीचे पत्रानुसार पुणे महानगरपालिका हद्दीतील आयटी व आयटीईएस संस्थांच्या ज्या मिळकतींची कर आकारणी निवासी/सवलतीचे दराने करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिका हद्दीत असलेल्या आयटी आयटीईएस प्रमाणपत्र असलेल्या आयटी संस्थांना यापुढे १४ ऑगस्ट २०१४ पर्यंत अंतर्भूत सवलत देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव झालेला आहे. सदरचा प्रस्ताव प्रथमत: दि.२६/०८/२००९ रोजी सादर करण्यात आलेला होता. त्यानंतर शासनाचे पत्र,अतिरिक्त महापालिका आयुक्त यांचे आदेश विचारात घेवून विषयपत्र दि.१५/१०/२०१३ अन्वये सादर केले होते. विषयपत्रामध्ये २००९ पासून सवलत मान्य करणेबाबत प्रस्ताव नमुद केलेला होता. परंतु शेवटच्या परिच्छेदामध्ये यापुढे असा शब्द आल्याने ठराव झालेला दिनांक म्हणजेच दि.२०/०५/२०१४ पासून दि.१५/०८/२०१४ अखेर सवलतीने करआकारणी करता येईल. ही बाब जरी विचारात घेतली तरी सदर ठरावामध्ये संदर्भातील क्र १ व ४ अंतर्भूत सवलत देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे, असे नमुद केले आहे. आयटी मिळकतींची सवलत १५.८.२०१४ रोजी संपली असून याबाबत मा.प्रधान सचिव उद्योग मंत्रालय यांना टीजीओ ३७४७ दि.१३.११.२०१४ रोजी कळविले असून त्यांचे पत्र आयटीपी/२०१४–सीआर/१३६/ आयएनडी २ दि १८.११.२०१४ अन्वये“It has come to the notice of the State Government that new proposals for IT Parks are not been considered by Pune Municipal Corporation. The Issue of giving extension to IT-ITES Policy 2009 is under consideration of the State Government and decision is likely to be taken shortly. I would request that any such proposals should be proceeded with as per existing IT-ITES Policy 2009.”असे कळविले आहे त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच मे. महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र. आयटीपी–२०१३/(प्र.क्र.२६५)/उद्योग–२, दि. २५/८/२०१५ रोजीचा शासन निर्णय विचारात घेता सन २०१५ आयटी/आयटीईएस धोरणातील परिशिष्ट १ मध्ये भारतातील आयटी मिळकतींचा विविध राज्यातील तुलनात्मक तक्ता विचारात घेता कर्नाटक राज्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील आयटी मिळकतींपेक्षा वाढ झालेली दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्यातील पुणे शहर हे आयटी शहर म्हणून प्रसिद्ध असून सन २००७–०८ ते २०१२–१३ अखेर व या क्षेत्रात त्यापुढे झालेली वाढ ही कमी आहे. महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय जा.क्र. आयटीपी–२०१३/(प्र.क्र.२६५)/उद्योग–२, दि. २५/८/२०१५ विचारात घेऊन पुणे शहरातील आयटी मिळकतींची कमी प्रमाणात झालेली वाढ तसेच सदर शासन निर्णयातील पान क्र ६ मधील मुद्दा क्र ३.२(अ) (५)मध्ये “उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना संबंधीत अधिकार क्षेत्रात लागू असलेल्या निवासी दराच्या सममूल्य दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल. सदरचा लाभ देण्याचा आवश्यक सल्ला शासनाच्या नगर विकास विभागाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येईल”. असे नमूद केले आहे . याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.मे.महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र.आयटीपी–२०१३/(प्र.क्र.२६५)/उद्योग–२, दि.२५/८/२०१५ रोजीचा शासन निर्णय विचारात घेता दि. १५/८/२०१५ नंतर प्राप्त होणाऱ्या भोगवटा पत्रानुसार ज्या भागात अशी आयटी मिळकत आहे त्याच भागातील निवासी वाजवी भाडयाच्या दराने मिळकतीची कर आकारणी करणेस. दि. १/४/२०१० ते पुढे ज्या मिळकतीची बिगर निवासी दराने कर आकारणी केलेली आहे अशा मिळकतीच्या कर आकारणीबाबत धोरणात्मक निर्णय घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस मा.स्थायी समिती ठ.क्र.११९२,दि.०६/०९/२०१६ मा.मुख्यसभा ठ.क्र.७०२,दि.२८/११/२०१६ अन्वये मान्यता झाली आहे.. त्यानुसार मा.महापालिकाआयुक्त कार्यालयीन आदेश जा.क्र.मआ/टिजीओ/८५२८ दि.४/२/२०१७ अन्वये खालील प्रमाणे कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

१.दि.०१/४/२०१० ते १४/८/२०१५ या कालावधीत व पुढे ज्या आयटी मिळकतीची बिगर निवासी दराने कर आकारणी केलेली आहे.अशा आयटी मिळकतींची बिगर निवासी दराने केलेली करपात्र रक्कम दि.३१/३/२०१७ अखेर कायम ठेवून मा.मुख्य सभेने मान्यता दिलेल्या विविध कराच्या दराने मिळकतकराची वसुली करावी.व अशा आयटी मिळकतीची वार्षिक करपात्र रक्कम दि.१/४/२०१७ पासून र.रू.३.६०प्रती चौ फुट निवासी वाजवी भाड्याच्यादराने फेर निश्चित करावी व याकरीता जिल्हा उद्योग केंद्राचे आयटी व आयटीईएस प्रमाणपत्र घेवून तसेच खात्याकडील पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांचा तपासणी निरीक्षण अहवाल घेवून कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांनी पुढील कार्यवाही करावी.व निश्चित केलेल्या करपात्र रक्कमेवर मा.मुख्य सभेने मान्यता दिलेल्या कराच्या दराने दि.१/४/१७ पासून आकारणी करावी व मिळकत कराची बिले पाठवावी. तथापी जर मिळकतीचा वापर आयटी,आयटीईएस धोरणा व्यतिरीक्त इतर कारणाकरीता वापर असेल तर वापरानुसार बिगर निवासी असल्यास वार्षिक करपात्र रक्कमेत बदल करण्यात येवू नये.

२. आयटी,आयटीईएस प्रमाणपत्र आहे अशा मिळकती कि ज्यांना २०१५ च्या धोरणाप्रमाणे १५/८/२०१५ नंतर भोगवटा पत्र प्राप्त झालेले असतील त्या मिळकतींची कर आकारणी रू.३.६० प्रती चौ.फुट निवासी वाजवी भाड्याच्या दराने किंवा संबंधीत विभागातील निवासी वाजवी भाड्याचा दर यापैंकी जो दर अधिक असेल त्या दराने निश्चित करणेत यावी.सन २०१७/१८ पासून पुढे ज्या ज्या आर्थिक वर्षात निवासी भाड्याच्या प्रती चौ.फुटाच्या दरामध्ये जेवढी वाढ होईल त्याप्रमाणे आयटी मिळकतींच्या सध्याच्या (रू.३.६०प्रती चौरस फुट ) दरामध्ये तेवढी वाढ करावी व त्यानुसार येणारा एकूण दर किंवा त्या त्या वर्षामध्ये आयटी मिळकतींची कर आकारणी संबंधीत विभागातील निवासी वाजवी भाड्याचा दर यापैंकी जो दर अधिक

असेल त्या दराने करपात्र रक्कम निश्चित करावी व याकरीता जिल्हा उद्योग केंद्राचे आयटी व आयटीईएस प्रमाणपत्र घेवून तसेच खात्याकडील पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांचा तपासणी निरिक्षण अहवाल घेवून उप आयुक्त, कर आकारणी व करसंकलन प्रमुख यांना कर आकारणी निश्चित करणेबाबत कार्यवाही करून मा.मुख्य सभेने दिलेल्या कराच्या दराने मिळकत कराचे देयके पाठवून मिळकतकराची वसुली करणेत यावी.

३.आयटी,आयटीईएस प्रमाणपत्र आहे अशा मिळकती कि ज्यांना २०१५ च्या धोरणाप्रमाणे १५/८/२०१५ नंतर भोगवटा पत्र प्राप्त झालेले असतील त्या मिळकतींची करआकारणी रू.३.६० प्रती चौ.फुट निवासी वाजवी भाड्याच्या दराने किंवा संबंधीत विभागातील निवासी वाजवी भाड्याचा दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराने निश्चित करणेत यावी

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १३२ (१) (ब) प्रमाणे मिळकतीचा वापर Public Workship किंवा Public Charitable Purpose करिता केला जात असेल अशा मिळकतींवर सर्वसाधारण कर बसविता येणार नाही अशी तरतूद केलेली आहे. केवळ एखादी संस्था Public Charitable Trust म्हणून नोंदविली गेली असेल तरी त्या संस्थेला सर्वसाधारण करामधून वगळले जाते. त्यामुळे अशा सर्व मिळकतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १३२ (१) (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. सदरची कार्यवाही करण्यापूर्वी अशा संस्थांकडून १.संस्थेचे ध्येय, प्रयोजन व उद्देश. २.संस्थेची निवेदन पत्रिका. ३. संस्थेचे तीन वर्षाचे हिशोबाची कागदपत्रे. ४. आयकर माफीचा दाखला. ५.धर्मादाय आयुक्त यांनी प्रमाणित केलेले नोंदणीपत्र. इत्यादी कागदपत्रे देणे आवश्यक आहेत.

### (सी) वृक्ष कर(Tree Cess) :-

| वार्षिक करपात्र मूल्य | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | १.००% | १.००% |

### (डी) सफाईपट्टी :-सदरचा कर मिळकतीच्या वार्षिक करपात्र रकमेवर आकारण्यात येतो.

| वार्षिक करपात्र मूल्य | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | २०.५० % | २०.५० % |
| | यामध्ये अंदाजपत्रक 'अ' साठी २% व अंदाजपत्रक 'क' साठी २३.५०% याप्रमाणे विभागणी राहील. | |

### (इ) जललाभकर :-

| वार्षिक करपात्र मूल्य | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | ५.७५ % | ५.७५ % |

### (एफ) जलनि:स्सारण कर :-

| वार्षिक करपात्र मूल्य | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | ९.५० % | ९.५० % |

### (जी) पथ कर :-

| वार्षिक करपात्र मूल्य | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | १०.००% | १०.००% |

### (एच) शिक्षण उपकर ( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४८ अ अन्वये)

| वार्षिक करपात्र मूल्य | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| करपात्र मूल्यावर | १.७५ % | १.७५ % |

| टिप- सन २०२३-२४ | सन २०२४-२५ |
|---|---|
| १.ज्या मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम कमी आहे अशा मिळकतींवर वरील अ.क्र. (अे) ते (एच) मध्ये नमुद केलेल्या विविध कराच्या दराने आकारण्यात येणारी कराची एकूण रक्कम किंवा रुपये ५५०/-यापैकी जी रक्कम | १.ज्या मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम कमी आहे अशा मिळकतींवर वरील अ.क्र. (अे) ते (एच) मध्ये नमुद केलेल्या विविध कराच्या दराने आकारण्यात येणारी कराची एकूण रक्कम किंवा रुपये ५५०/-यापैकी जी रक्कम |

| | |
|---|---|
| जास्तीची असेल ती रक्कम मिळकतकर म्हणून आकारण्यात यावी. | जास्तीची असेल ती रक्कम मिळकतकर म्हणून आकारण्यात यावी. |
| २.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १३२ मधील तरतूदीनुसार ज्या मिळकतींना सर्वसाधारण करात माफी आहे व ज्या मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम रुपये १ पेक्षा जास्त आहे. अशा मिळक़तींवर वरील अ.क्र. (अे) ते (एच) मध्ये नमुद केलेल्या विविध कराच्या दराने आकारण्यात येणारी कराची एकूण रक्कम किंवा रुपये ५५०/- यापैकी जी रक्कम जास्तीची असेल ती रक्कम मिळकतकर म्हणून आकारण्यात यावी. तसेच मंदिर, मस्जिद, चर्च व इतर धार्मिक स्थळांना सर्वसाधारण कर माफ असल्याने अशा मिळकती की ज्यांची वार्षिक करपात्र रक्कम रु. १ ते ५०० पर्यत आहे, त्यांना कमीत कमी कर रु. ५५०/- न आकारता अस्तित्वातीलच कर आकारण्यात यावा | २.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १३२ मधील तरतूदीनुसार ज्या मिळकतींना सर्वसाधारण करात माफी आहे व ज्या मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम रुपये १ पेक्षा जास्त आहे. अशा मिळक़तींवर वरील अ.क्र. (अे) ते (एच) मध्ये नमुद केलेल्या विविध कराच्या दराने आकारण्यात येणारी कराची एकूण रक्कम किंवा रुपये ५५०/- यापैकी जी रक्कम जास्तीची असेल ती रक्कम मिळकतकर म्हणून आकारण्यात यावी. तसेच मंदिर, मस्जिद, चर्च व इतर धार्मिक स्थळांना सर्वसाधारण कर माफ असल्याने अशा मिळकती की ज्यांची वार्षिक करपात्र रक्कम रु. १ ते ५०० पर्यत आहे, त्यांना कमीत कमी कर रु. ५५०/- न आकारता अस्तित्वातीलच कर आकारण्यात यावा |

**(आय) शहर व मनपा हद्दीतील समाविष्ट गावासह मिळकत करातील करपात्र रकमेच्या प्रमाणातील पाणीपट्टी .**

| **(१)निवासी करपात्र रक्कम रुपये** | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| ०००१ ते १,००० | १७६३/- | १७६३/- |
| १,००१ ते ३,००० | १९५८/- | १९५८/- |
| ३,००१ ते ५,००० | २१५६/- | २१५६/- |
| ५,००१ ते पुढे | करपात्र रकमेच्या ४८.६७%किंवा रू ४८६७/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम | करपात्र रकमेच्या ४८.६७%किंवा रू ४८६७/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| **(२) बिगर निवासी करपात्र रक्कम रुपये** | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
| ०००१ ते १,००० | १४७०/- | १४७०/- |
| १,००१ ते ३,००० | १४७०/- | १४७०/- |
| ३००१ ते ५००० | १४७०/- | १४७०/- |
| ५००१ ते १०००० | १४७०/- | १४७०/- |
| १०००१ ते पुढे | ३९१८/- | ३९१८/- |
| टिप :- ज्या बिगरनिवासी मिळकतींना नळजोड नाही अशा नळजोड नसलेल्या व्यावसायीक मिळकतींना हे दर लागू राहतील. | | |

| **३) धार्मिक स्थळे करपात्र रक्कम रुपये** | प्रचलित दर सन २०२३-२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४-२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| ००१ ते ५०० | ० | ० |
| ५०१ ते १,००० | ११५९/- | ११५९/- |
| १,००१ ते ३,००० | १२८८/- | १२८८/- |
| ३,००१ ते ५,००० | १४१७/- | १४१७/- |
| ५,००१ चे पुढे | करपात्र रकमेच्या ३२%किंवा रू ३२०० यापैकी जी कमी असेल ती रक्कम | करपात्र रकमेच्या ३२%किंवा रू ३२०० यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| | | |
| (४) पुरग्रस्त वसाहती | रुपये ५८९/- एकवट | रुपये ५८९/- एकवट |
| (५) धनकवडी, बिबवेवाडी पुनर्वसन,पुणे मनपाच्यावतीने झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत विकसीत झालेल्या मिळकती. | रुपये ५८९/- एकवट | रुपये ५८९/- एकवट |

| | | |
|---|---|---|
| (६) मनपा हद्दवाढ<br>(अ)शुद्ध फिल्टरने पाणी पुरवठा होणारी गांवे.<br>१. घरगुती वापर (स्वतंत्र नळजोड असल्यास).<br>२. घरगुती वापर (नळकोंडाळ्यावर पाणी पुरवठा असल्यास).<br>३. बिगर घरगुती (ज्या व्यावसायिक मिळक़तींना स्वतंत्र नळजोड आहेत, अशा मिळकतींना हा दर लागू आहे.) | रुपये १९५८/– वार्षिक<br>रुपये १४७०/– वार्षिक<br>रुपये २९३८/–वार्षिक | रुपये १९५८/– वार्षिक<br>रुपये १४७०/– वार्षिक<br>रुपये २९३८/–वार्षिक |
| ४. अमृततुल्य शहर व समाविष्ट गाव यासाठी (शहर व समाविष्ट गावातील अमृततुल्य व्यावसायिकांना मीटर नाहीत अशा मिळकतींना हा दर लागू आहे.) | रुपये ११७५/– | रुपये ११७५/– |
| ५. जुन्या ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा सुरु असल्यास (ग्रामपंचायतीकडील रजिस्टर नमुना ८ वर नोंदणीकृत असलेल्या मिळकती)<br><br>**<u>टिप :–</u>** | रु.७३६/– वार्षिक एकवट किंवा पूर्वीचा दर यापेक्षा जो जास्त असेल त्या दराने<br><br>पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये ज्या ठिकाणी पाणी पुरवठा विषयक विकासकामे झालेली नाहीत. अशा ठिकाणी तसेच ज्या भागात टँकरने पाणी पुरवठा होतो, अशा ठिकाणच्या मिळकतींना पाणीपट्टी रक्कम रुपये ११२७/वार्षिक घेणेत यावी. | रु.७३६/– वार्षिक एकवट किंवा पूर्वीचा दर यापेक्षा जो जास्त असेल त्या दराने<br><br>पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये ज्या ठिकाणी पाणी पुरवठा विषयक विकासकामे झालेली नाहीत. अशा ठिकाणी तसेच ज्या भागात टँकरने पाणी पुरवठा होतो, अशा ठिकाणच्या मिळकतींना पाणीपट्टी रक्कम रुपये ११२७/– वार्षिक घेणेत यावी. |

सन २०१७ मध्ये ग्रामपंचायतीकडील समाविष्ट ११ गावांपैकी खालीलप्रमाणे मिळकतकर बिलात पाणीपट्टीची आकारणीकरणेबाबत मा.मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग जा.क्र.४२७६ दि.०४/०१/२०२१ चे पत्रानुसार.

१. **<u>लोहगाव व उंड्री</u>** – या गावाकडील पाण्याचे मीटर/नळजोड नसलेल्या निवासी व बिगर निवासी मिळकतींना त्यांचे वार्षिक करपात्र रक्कमेच्या निर्धारीत केलेल्या पाणीपट्टीच्या (सन २०२२–२३ साठी मा.मुख्य सभेने मान्य केलेले पाणीपट्टीचे दर) ४०% पाणीपट्टी आकारणेस.

२. **<u>मुंढवा, साडेसतरानळी, फुरसुंगी, उरुळीदेवाची</u>**– या गावाकडील पाण्याचे मीटर/नळजोड नसलेल्या निवासी व बिगर निवासी मिळकतींना त्यांचे वार्षिक करपात्र रक्कमेच्या निर्धारीत केलेल्या पाणीपट्टीच्या (सन २०२३–२४ साठी मा.मुख्य सभेने मान्य केलेले पाणीपट्टीचे दर) ६०% पाणीपट्टी आकारणेस.

३. **<u>धायरी, आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक</u>** – या गावाकडील पाण्याचे मीटर/नळजोड नसलेल्या निवासी व बिगर निवासी मिळकतींना त्यांचे वार्षिक करपात्र रक्कमेच्या निर्धारीत केलेल्या पाणीपट्टीच्या (सन २०२३–२४ साठी मा.मुख्य सभेने मान्य केलेले पाणीपट्टीचे दर) ६०% पाणीपट्टी आकारणेस.

४. **<u>शिवणे (संपुर्ण उत्तमनगर)</u>** –मा.मुख्य सभा ठराव क्र.३८७ दि.२२/९/२०२१ चे मान्यतेनुसार कार्यवाही करणेस.

५. वरील गावांव्यतिरिक्त सन २०२१ मध्ये नव्याने समाविष्ठ झालेली २३ गावे– मा.मुख्य अभियंता,पाणीपुरवठा पुणे मनपा यांचे शिफारसीनुसार प्रत्येक गावांसाठी मान्य केलेले टक्केवारीनुसार वार्षिक करपात्र रक्कमेवर पाणीपट्टी आकारणेस

६. मुख्य अभियंता कार्यालय जा.क्र.७४४४ दि.२८/१२/२०२२ चे अभिप्रायानुसार पुणे महानगरपालिके मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी शिवणे व संपूर्ण उत्तम नगर आणि २३ गावांपैकी न्यू कोपरे व कोंढवे–धावडे या गावांना पुणे महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा सुरू करण्यात आला असल्याने वरील चारही समाविष्ट गावांची मिळकत कराची देयकाची पाणीपट्टी आकारणेस

७. संदर्भ क्र.२व३ नुसार पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांना मान्य पाणीपट्टीच्या दराच्या २०% सन २०२३–२४ साठी पाणीपट्टी आकारणेबाबतमा.मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी कळविले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट २३ गावांकरीता सन २०२४–२५ चे चालू वर्षीचे शहरातील पाणीपट्टीच्या दराच्या २०% दराने पाणीपट्टी आकारणेस.

(वाघोली, म्हाळुंगे, सुस, बावधन बु., किरकीटवाडी, कोंढवे–धावडे, कोपरे, नांदेड, खडकवासला, मांजरी बु., नांदोशी, सणसनगर, मांगडेवाडी, भिलारेवाडी, गुजर निंबाळकर वाडी, पिसोळी, वडाची वाडी, शेवाळेवाडी, नऱ्हे, होळकरवाडी, औताडे हांडे वाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी)

## (जे) विशेष सफाई कर :–

सदर कर हॉटेल्स,रेस्टॉरंट, मंगल कार्यालये व हॉस्पीटल या मिळकतींवर वार्षिक करपात्र रकमेनुसार

| तपशील | प्रचलित दर सन २०२३–२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४–२५ शेकडा रुपये |
|---|---|---|
| हॉटेल्स, रेस्टॉरंटस,मंगल कार्यालये व हॉस्पीटल्स ज्यांची वार्षिक करपात्र रक्कम रू.५,००० अगर त्यापेक्षा अधिक आहे . | हॉटेल्स,रेस्टॉरंट, मंगल कार्यालये व हॉस्पीटल ज्यांची करपात्र र.रु.५,०००/– अगर त्यापेक्षा अधिक असलेल्या मिळक़तींवर रक्कम रुपये २,०००/– अगर १५ % यापैकी जी रक्कम जास्त आहे ती.. | हॉटेल्स,रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, हॉस्पीटल, मॉल्स, मार्टस ज्यांची करपात्र र.रु.५,०००/– अगर त्यापेक्षा अधिक असलेल्या मिळक़तींवर रक्कम रुपये २,०००/– अगर १५ % यापैकी जी रक्कम जास्त आहे ती.. |

**(के) मोबाईल टॉवर्सनां खालील(एल)मधील तक्त्यामध्ये नमूद केलेले दर लागू राहतील.**

## (एल )पुणे शहरात असलेल्या व ज्यांची कर आकारणी ३१.३.२०१० अखेर पर्यंत झालेली आहे अशा आयटी व आयटीईएस मिळकतीस कराचे दर खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कराचे नाव | प्रचलित दर सन २०२३–२४ शेकडा रुपये | प्रचलित दर सन २०२४–२५ शेकडा रुपये |
|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण कर करपात्र रकमेचे टप्पे | | |
| | रू. १ ते २००० | १६.७५% | १६.७५% |
| | २००१ ते ५००० | २५% | २५% |
| | ५००१ ते २०००० | ३८% | ३८% |
| | २०००१ ते पुढे | ५०% | ५०% |
| २. | सफाई कर | २०.५०% | २०.५०% |
| ३. | अग्निशामक कर | २% | २% |
| ४. | जललाभ कर | ५% | ५% |
| ५. | जलनि:स्सारण लाभ कर | १०% | १०% |
| ६. | पथकर | १०% | १०% |
| ७. | वृक्षकर | १% | १% |
| ८. | मनपा शिक्षण उपकर | २% | २% |

**दि.०१/०४/२०१० ते पुढे बिगरनिवासी दराने करआकारणी झालेल्या आयटी व आयटीईएस मिळकतींची निवासी दराने फेरकरआकारणी दि.१/४/२०१७ पासून होणार असल्याने अशा मिळकतीस व दि.१५/८/२०१५ पासून नव्याने निवासी दराने करआकारणी होणाऱ्या आयटी व आयटीईएस मिळकतीस वरील एल मध्ये नमूद दर लागू राहील.**

## (एम) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४० अ अन्वये सवलत.

| तपशील | सन २०२३–२४ मधील दर | सन २०२४–२५ साठी दर |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी १४ ,२००९ पौष २४ शके१९३० अन्वये महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम १४० अ अन्वये – फक्त चालू सरकारी वर्षातील (प्रतिवर्षी) मिळकतकर अंतर्गत येणारी एकूण मागणी विचारात घेऊन त्यामधील सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रू. २५,०००/– पेक्षा कमी आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत १०% सूट व ज्यांची सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रू. २५,००१/– पेक्षा अधिक आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत ५% सूट. | महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी १४ ,२००९ पौष २४ शके१९३० अन्वये महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम १४० अ अन्वये – फक्त चालू सरकारी वर्षातील (प्रतिवर्षी) मिळकतकर अंतर्गत येणारी एकूण मागणी विचारात घेऊन त्यामधील सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रू. २५,०००/– पेक्षा कमी आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत १०% सूट व ज्यांची सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रू. २५,००१/–पेक्षा अधिक आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत ५% सूट. |

## (एन) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४० ब अन्वये सवलत

| तपशील | सन २०२३–२४ मधील दर | सन २०२४–२५ साठी दर |
|---|---|---|
| पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या | महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी १४ | महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी १४ |

| | | |
|---|---|---|
| निवासी मिळकतींमध्ये<br>(१) सौरऊर्जा वापर,<br>(२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे,<br>(३)ओला व सुका कचरा वेगळा करून गांडूळखत प्रकल्प राबविणे. | ,२००९ पौष २४ शके १९३० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० ब अन्वये –<br>१)पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीन पैकी दोन बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या दराच्या १०% सूट (पाणीपटटी व शासनाचे कराव्यतिरिक्त)<br>२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीन पैकी एका बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या दराच्या ५ % सूट (पाणीपटटी व शासनाचे कराव्यतिरिक्त) | ,२००९ पौष २४ शके १९३० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० ब अन्वये –<br>१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे.<br>या तीन पैकी दोन बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या दराच्या १०% सूट (पाणीपटटी व शासनाचे कराव्यतिरिक्त)<br>२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीनपैकी एका बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या दराच्या ५ % सूट (पाणीपटटी व शासनाचे कराव्यतिरिक्त) |

**विषय क्र.३९४**

संदर्भ :- १) मा.मुख्य लेखा व वित्त विभाग यांचेकडील जा.क्र.४३९३, दि.१५/१/२०२४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१३,दि.५/२/२०२४
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि क्र.५/१४४२,दि.१/२/२०२४ चे पत्र.

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेकडील पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये मास्टर प्लॅन नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे,बजेट कोड –ZE16B102/D2-369 या कामासाठी उपलब्ध असलेल्या ५० कोटी तरतुदीमधून प्रभाग क्र.१९ मधील विकास कामासाठी र.रू.५० लक्ष वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण विभाग ( प्रकल्प ) बजेट कोड – ZE16B102/D2-369<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. | ५० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>परिमंडळ क्र.५<br>१) प्र.क्र.१९ मधील काशेवाडी झोपडपट्टी मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे व चेंबर समपातळीत करणे. | --- | २५ लक्ष |
| २) प्र.क्र.१९ मधील एकबोटे कॉलनी परिसरातील चेंबर साफसफाई करणे व दुरूस्ती करणे. | --- | २५ लक्ष |

**विषय क्र.३९५**

संदर्भ :- १) सन २०२३-२४ अंदाजपत्रकीय उपलब्ध तरतूद र.रू.०.९० कोटी

२) मा.वित्तीय समितीची प्राप्त मान्यता

३) पथ विभाग जा.क्र.३८३३, दि१७/७/२०२३ अन्वये प्रस्तावित कामासाठी अपुऱ्या पडणाऱ्या निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब,नुसार खर्चाचे दायित्व स्विकारणेकरीताचा प्रस्ताव

४) संदर्भ क्र.३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्वीकारण्यासाठीच्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त ( वि ) प्रशासकीय प्राप्त मान्यता.

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४४३, दि.१/२/२०२४ चे पत्र

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१४,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक तथा महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार-

केशवनगर मंत्रा इनसिग्निया, गेरा रेसिडेन्सी, सिल्व्हर सॅडकडे जाणारा सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता विकसित करणे या प्रकल्पीय कामी अपुऱ्या पडणाऱ्या आवश्यक र.रू.१.५७ कोटी निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्वीकारण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३९६**

संदर्भ :- १) मा.वित्तीय समिती बैठक दिनांक ४/१०/२०२३ इतिवृत्त जा.क्र.३१६४, दि.२३/१०/२०२३

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि:सारण/१४४४, दि.१/२/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१५,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत एकूण ५ कामांच्या र.रू.२.२५ कोटीच्या वर्गीकरणास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात यावी.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण विभाग ( प्रकल्प ) बजेट कोड - ZE16B102/D2-369<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. | २.२५ कोटी | --- |
| नवीन सुचविलेली कामे -<br>मलनि:सारण व देखभाल दुरूस्ती विभाग | | |
| १) प्र.क्र.३१ मध्ये स्टेट बँक नगर परिसरात मोठ्या व्यासाची लाईन टाकणे व जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ०.५० कोटी |
| २) प्र.क्र.३१ मध्ये आंबेडकर कॉलनी व परिसरात जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | ०.४० कोटी |
| ३) प्र.क्र.३१ मध्ये गल्ली क्र.२ कर्वेनगर येथे ड्रेनेज लाईन बदलून मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ०.४५ कोटी |
| ४) प्र.क्र.३१ मध्ये गल्ली क्र.९ कर्वेनगर येथे ड्रेनेज लाईन बदलून मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ०.४५ कोटी |
| ५) प्र.क्र.३१ मध्ये गल्ली क्र.१० कर्वेनगर येथे ड्रेनेज लाईन बदलून मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ०.४५ कोटी |
| एकूण र.रूपये | २.२५ कोटी | २.२५ कोटी |

**विषय क्र.३९७**

संदर्भ :- १) मुख्य लेखा व वित्त विभाग यांचेकडील जा.क्र.४३९३, दि.१५/१/२०२४ चे इतिवृत्त

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि क्र.५/१४४५, दि.१/२/२०२४ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१६,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेकडील पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. बजेट कोड – ZE16B102/D2-369 या कामासाठी उपलब्ध असलेल्या र.रू.५० कोटी तरतुदीमधून प्रभाग क्र.१९ मधील विकास कामांसाठी खालीलप्रमाणे र.रू.१००लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण विभाग ( प्रकल्प ) बजेट कोड – ZE16B102/D2-369<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. | १०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>परिमंडळ क्र.५ | | |
| १) प्र.क्र.१९ मधील एकबोटे कॉलनी, लोहियानगर, हरकानगर, काशेवाडी व भवानी पेठ परिसरातील चेंबर समपातळीत करणे व ड्रेनेज लाईन साफसफाई करणे व गाळ काढणे | --- | २५ लक्ष |
| २) प्र.क्र.१९ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) प्र.क्र.१९ मधील कामगार मित्र मंडळ ते विशाल तरूण मंडळ पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे व इतर ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| ४) प्र.क्र.१९ मधील काशेवाडी मित्र मंडळ ते काशेवाडी पोलीस चौकी पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे व प्रभागातील इतर ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |

**विषय क्र.३९८**

संदर्भ :- १) सन २०२३-२४ ची CE20A1249/A6-636 लक्ष अन्वयेची उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूद र.रू.१०० लक्ष

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४४६, दि.१/२/२०२४ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१७,दि.५/२/२०२४ रोजीचा ठराव

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

हडपसर मगरपट्टा सिटी मागील दोन्ही पुलाला जोडणारा २४ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे या कामासाठी कमी पडणारा उर्वरित आवश्यक निधी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम७२ब, नुसार र.रू.४,५३,१७,९६१/- खर्चाचे दायित्व स्विकारण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३९९**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१४४७, दि.१/२/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१८,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत विविध शाळांमध्ये उर्वरित विकास कामे करणेकमी र.रू.२०० लक्ष तरतूद खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| भवन रचना विभाग, बजेट कोड – CE12A422/J2-21<br>नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील शाळांसाठी कामे करणे. | २०० लक्ष | --- |
| नविन सुचविलेली कामे – | | |

| | | |
|---|---|---|
| भवन विभागाकडील कामे | | |
| १) पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत माता रमाबाई आंबेडकर विद्यालय चिखलवाडी बोपोडी मनपा शाळा क्र.६० बी इंग्रजी ६० बी मराठी या शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे. | --- | ४० लक्ष |
| २) पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत छत्रपती शिवाजी प्राथ.विद्यालय बि.नि.१ शुक्रवार पेठ या शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे. | --- | २० लक्ष |
| ३) पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत कर्वेनगर येथील सम्राट अशोक शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे. | --- | ४० लक्ष |
| ४) पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजने अंतर्गत भारतरत्न सचिन रमेश तेंडूलकर क्रीडा निकेतन या शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे. | --- | ४० लक्ष |
| ५) पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत २५ जी इंग्रजी घोरपडी पेठ या शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे. | --- | ३० लक्ष |
| ६) ) पुणे शहरामध्ये आदर्श शाळा योजनेंतर्गत कै.चिंतामण देशमुख प्रा.विद्यालय ९९ बी.,इंदिरानगर,बिबवेवाडी मनपा शाळा क्र.१३८ बी या शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे. | --- | ३० लक्ष |

**विषय क्र.४००**

संदर्भ :- १) सदर कामी सन २०२३-२४ अंदाजपत्रकीय उपलब्ध तरतूद र.रू.५० लक्ष
२) सदर कामी मा.वित्तीय समितीची प्राप्त मान्यता
३) पथ विभाग जा.क्र.५३६९,दि.२५/८/२०२३ अन्वये अपुऱ्या पडणाऱ्या निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्विकारण्यासाठीचा प्रस्ताव.
४) संदर्भ क्र.३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्विकारण्यासाठीच्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त (वि) प्रशासकीय प्राप्त मान्यता.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४४८, दि.१/२/२०२४ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५१९,दि.५/२/२०२४ रोजीचा ठराव

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

उंड्री येथे विविध कल्व्हर्टविषयक व तदनुषंगिक कामे करणे या प्रकल्पीय कामासाठी अपुऱ्या पडणाऱ्या र.रू. १.१५ कोटी एवढया खर्चाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार दायित्व स्वीकारण्यासाठी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.४०१**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१४४९, दि.१/२/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२०,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

स.नं.११४/११५, बाणेर येथे वर्किंग वुमेन हॉस्टेल बांधणेसाठी र.रू.६० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| भवन रचना विभाग,<br>भारतरत्न अटबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामकाजासाठी बजेट कोड- CE17A242/SJ6-93 एकूण र.रू.१३७००.०० लक्ष | ६० लक्ष | --- |
| नविन सुचविलेले काम - | | |
| भवन रचना विभाग<br>स.नं.११४/११५, बाणेर येथे वर्किंग वुमेन हॉस्टेल बांधणे. | --- | ६० लक्ष |

**<u>विषय क्र.४०२</u>**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१४५०, दि.१/२/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२१,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

प्रभाग क्र.२३ई-लर्निंग स्कूल येथे स्थापत्य विषयक कामे करणेसाठी र.रू.१५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| भवन रचना विभाग<br>प्रभाग क्र.२३ मध्ये कै.रोहन अप्पा काळे दवाखाना बांधणे. बजेट कोड - CE17A242/J6-69 एकूण र.रू.१५ लक्ष पैकी मा.वित्तीय समितीत मान्य र.रू.१५ लक्ष | १५ लक्ष | --- |
| नविन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.२३ई-लर्निंग स्कूल येथे स्थापत्य विषयक कामे करणे. | --- | १५ लक्ष |

**<u>विषय क्र.४०३</u>**

संदर्भ :- १) सन २०२३-२४ अंदाजपत्रकीय उपलब्ध तरतूद र.रू.१.०० कोटी

२) मा.वित्तीय समितीची प्राप्त मान्यता

३) पथ विभाग जा.क्र.४३७९, दि२८/७/२०२३ अन्वये प्रस्तावित कामासाठी अपुऱ्या पडणाऱ्या निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब,नुसार खर्चाचे दायित्व स्विकारणेकरीताचा प्रस्ताव

४) संदर्भ क्र.३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्वीकारण्यासाठीच्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त ( वि ) प्रशासकीय प्राप्त मान्यता.

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४५१, दि.१/२/२०२४ चे पत्र

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२२,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

हडपसर साडेसतरानळी साधना बँक ते स.नं.१७६,१७७,२४१,२४२ येथील नाल्यावरील अस्तित्वातील पाईप कल्व्हर्टचे ठिकाणी आर.सी.सी.कल्व्हर्ट पुलाचे काम करणे या प्रकल्पीय कामासाठी अपुऱ्या पडणाऱ्या र.रू.१.१४ कोटी एवढया निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्वीकारण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.४०४</u>**

संदर्भ :- १) नॅशनल बुक ट्रस्टचे F.NO/CM/PBB/2023, दि.२८/११/२०२३ चे पत्र.

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१४५२,दि.१/२/२०२४ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२३,दि.५/२/२०२४

----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

१) एस.पी.कॉलेज, पुणे येथे दि.१४/१२/२०२३ रोजी झालेल्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्टोरी टेलिंगचे कार्यक्रमासाठी करणेत आलेल्या मंडप व बैठक व्यवस्था व इतर तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे.

२) पुणे महानगरपालिका, बर्नार्ड व्हॅन लीर फाऊंडेशन यांच्या सहकार्याने, सारसबाग,पुणे येथे १४ डिसेंबर ते १७ डिसेंबर २०२३ या कालावधीत झालेल्या बालोत्सव कार्यक्रमासाठी मंडप व बैठक व्यवस्था व इतर तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे.

या कामांची देयके महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये अदा करणेत येत असल्याची खालील बाबी मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

१) एस.पी.महाविद्यालयचे मैदानामध्ये दि.१४/१२/२०२३ रोजी झालेल्या स्टोरी टेलिंग गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करणेसाठीचे कार्यक्रमासाठी तसेच पुणे महानगरपालिका, बर्नार्ड व्हॅन लीर फाऊंडेशन यांच्या सहकार्याने, सारसबाग, पुणे येथे दि.१४ डिसेंबर ते १७ डिसेंबर २०२३ या कालावधीत झालेल्या बालोत्सव कार्यक्रमासाठी करणेत आलेल्या मंडप व बैठक व्यवस्था व इतर तदनुषंगिक कामे करणे या कामाचे ठेकेदार मे.बालाजी मंडप डेकोरेटर्स यांचा एकूण

र.रू.५७,३०,०६६=३० ( जी.एस.टी.सह ) अक्षरी र.रू.सत्तावन्न लक्ष तीस हजार सहासष्ट पैसे तीस फक्त इतका खर्च महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये त्यांचे १% कमी दराने आदा करणेत येत असल्याची व त्यासाठी त्यांचे समवेत आता कोणताही करारनामा करणेत येत नसल्याची व कोणतीही अनामत रक्कम घेणेत येत नसल्याची बाब.
२) वरील प्रमाणे केलेल्या कामाचा खर्च मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्गीकरणाद्वारे तरतूद उपलब्ध झाल्यानंतर करणेत येत असल्याची बाब.

**विषय क्र.४०५**

संदर्भ :- १) मुख्य अभियंता ( पथ ) कार्यालयाकडील जा.क्र.पथ/९२९३, दि.२९/११/२०२३ चे पत्र.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१४५३, दि.१/२/२०२४ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२४,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –
१) मौजे सुस हद्दीपासून ते सनी वर्ल्डपर्यंत MSEDCL ची हाय टेन्शन २२ केव्ही ओव्हरहेड लाईन भूमिगत करणे कामासाठी र.रू.१०० लक्ष.२) मौजे सुस हद्दीपासून ते सनी वर्ल्डपर्यंत MSEDCL ची एल.टी.ओव्हरहेड लाईन भूमिगत करणे कामासाठी र.रू.५० लक्ष ३) बाणेर येथील सदानंद हॉटेल ते सुस-पाषाण ब्रिज दरम्यान सर्विस रस्त्यावरील MSEDCL ची एल.टी. व एच.टी.ओव्हरहेड लाईन भूमिगत करणे कामासाठी र.रू.१५० लक्ष असे एकूण र.रू.३०० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| पथ विभाग, बजेट कोड- CE20A1262/A15-194, बाणेर येथील स.नं.९८ मधून जाणारा १८ मी.रस्ता सिमेंट कॉक्रीटचा करणे. | ३०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>खाते – विद्युत विभाग | | |
| १) मौजे सुस हद्दीपासून ते सनी वर्ल्डपर्यंत MSEDCL ची हाय टेन्शन २२ केव्ही ओव्हरहेड लाईन भूमिगत करणे. | --- | १०० लक्ष |
| २) मौजे सुस हद्दीपासून ते सनी वर्ल्डपर्यंत MSEDCL ची एल.टी.ओव्हरहेड लाईन भूमिगत करणे | --- | ५० लक्ष |
| ३) बाणेर येथील सदानंद हॉटेल ते सुस-पाषाण ब्रिज दरम्यान सर्विस रस्त्यावरील MSEDCL ची एल.टी. व एच.टी.ओव्हरहेड लाईन भूमिगत करणे. | --- | १५० लक्ष |

**विषय क्र.४०६**

संदर्भ :- १) सदर कामी सन २०२३-२४ अंदाजपत्रकीय उपलब्ध तरतूद र.रू.६० लक्ष
२) सदर कामी मा.वित्तीय समितीची प्राप्त मान्यता.
३) पथ विभाग जा.क्र.३९३०, दि.१८/७/२०२३ अन्वये अपुऱ्या पडणाऱ्या निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्वीकारण्यासाठीचा प्रस्ताव.
४) संदर्भ क्र.३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ब, नुसार खर्चाचे दायित्व स्वीकारण्यासाठीच्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त (वि) प्रशासकीय प्राप्त मान्यता.
५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४५४,दि.१/२/२०२४ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२५,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –
उंड्री येथील आंबेकर हॉटेल ते ब्रिक्स कॉलेज १२ मी.शीव रस्ता विकसित करणे या प्रकल्पीय कामी अपुऱ्या पडणाऱ्या आवश्यक र.रू.५.३९ कोटी निधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब, नुसार खर्चाचे दायित्व स्विकारण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.४०७**

संदर्भ :- १) सह.जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विभागाकडील जा.क्र.६६३९/२२,दि.४/५/२०२२ रोजीचे पत्र.
२) पुणे महानगरपालिका सभा ठराव क्र.७१,दि.१७/६/२०२२
३) मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय दि.१४/९/२०२२ रोजीची ताबेपावती.

४) सह.जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विभागाकडील जा.क्र.१३/१४७५०,दि.२६/१०/२०२३ रोजीचे पत्र.

५) सह.जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विभागाकडील जा.क्र.२१ व २२ / ३६३ / २०२४, दि.३/१/२०२४ रोजीचे पत्र.

६) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य./१४५६,दि.१/२/२०२४ चे पत्र.

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२७,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ कोथरूड स.नं.७/३ +४ , २३/३+४ पिनॅक कॉम्प्लेक्स या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील ऑफिस १,२,८ व शॉप क्र.१,२,५,६ व ७ असे एकूण २४३३.५१ चौ.फुट जागा सह.जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयास प्रती माहे रक्कम रू.५८,४५५/- ( अधिक शासकीय कर ) भाड्याने उपलब्ध देणेस ( दर ३ वर्षानी ५टक्के वाढ करण्यास.) आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.४०८</u>**

संदर्भ :- १) सह जिल्हा निबंधक यांचेकडील पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.सजिनी/पु.श./लेका/ हवेली क्र. १५/१६३३८ /२०२३, दि.२१/११/२०२३

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य./१३७६,दि.२३/१/२०२४ चे पत्र.

३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०५, दि.३१/१/२०२४ चा विचारासाठी

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२८,दि.५/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ बाणेर स.नं.८५ येथील स्मार्ट फार्मर या इमारतीमधील तळमजल्यावरील गाळा मा.सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर कार्यालय भाडे तत्वावर देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ बाणेर स.नं.८५ येथील स्मार्ट फार्मर या इमारतीमधील तळमजल्यावरील गाळ्यांपैकी २१० चौ.मी.क्षेत्र १५ वर्षे कालावधीसाठी ( दर ३ वर्षानी १२ टक्के भाडेवाढ करून ) मा.सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर कार्यालय यांना मासिक भाडे र.रू.४८,५१५/- प्रमाणे भाडेतत्वावर देणेस.

२) पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील भाग १२(२६) प्रमाणे मा.सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर कार्यालय,पुणे विभाग यांचेकडून मासिक भाडे र.रू.४८,५१५/- अधिक शासकीय कर घेणेस.

३) मा.सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर कार्यालय यांच्या समवेत करारनामा करणेस.

**<u>विषय क्र.४०९</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य./१३७८, दि.२३/१/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१०६,दि.३१/१/२०२४

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५२९,दि.५/२/२०२४ रोजीचा ठराव

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ शिवाजीनगर फा.प्लॉट ५५१ येथील वीर चाफेकर मार्केट या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील गाळा संचालक, पंचायत राज,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना भाडेतत्वावर देणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ शिवाजीनगर फा.प्लॉट ५५१ येथील वीर चाफेकर मार्केट या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील गाळा ( क्षेत्र २५२.७० चौ.मी.) ३ वर्षे कालावधीसाठी संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना मासिक भाडे र.रू.५८,२९७/- ( अधिक वस्तू व सेवाकर ) प्रमाणे भाडेतत्वावर देणेस.

२) पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील भाग १२(२६) संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मासिक भाडे र.रू.५८,२९७/- ( अधिक वस्तू व सेवाकर ) घेणेस.

३) संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य , पुणे यांच्या समवेत करारनामा करणेस.

**विषय क्र.४१०**

संदर्भ :- १) मा.संचालक ( वर्क्स ) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांचे जा.क्र.METRO/PMRP/LAND/२०२२ /२१९,दि.१०/५/२०२२ रोजीचे पत्र.

२) मा.संचालक ( वर्क्स ) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांचे इकडील आ.क्र.५१६७,दि.२४/८/२०२३ रोजीचे पत्र

३) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील जा.क्र.माव्य/६३४१,दि.५/१/२०२४ रोजीचे पत्र.

४) मा.संचालक ( वर्क्स ) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांचेकडील आ.क्र.११५३४,दि.८/२/२०२४ रोजीचे पत्र.

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१५४६, दि.८/२/२०२४ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६३२,दि.९/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

स्वारगेट ट्रान्सपोर्ट हबच्या कामासाठी पुणे महानगरपालिकेच्या मालकीची पर्वती टीपी स्कीम-३ फा.प्लॉट नं.४९९ व ५०० अ, येथील १३,९४१.९४ चौ.मी.जागा महामेट्रोला कायम स्वरूपी देणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पर्वती टी.पी.स्किम ३, फा.प्लॉट नं.४९९ व ५००अ,येथील १३,९४१.९४ चौ.मी.जागेची किंमत र.रू. ३३,१९,५७,५९१/-व पार्किंगचे बांधिव इमारतीची किंमत र.रू.६,३५,००,०००/- अशी एकूण र.रू. ३९,५४,५७,५९१/- पुणे मनपाचे आर्थिक दायित्वामधून वळती करून घेणेस व सदरची जागा मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर मे.राज्य शासनाची मान्यता घेऊन महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांना कायम स्वरूपी देणेस.

२) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांना जागेचा आगाऊ ताबा दिलेला असल्याने वरील मान्यतेनुसार महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांचेसोबत करारनामा करणेस.

**विषय क्र.४११**

संदर्भ :- १) विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्र क्र.सा./वि/६३,दि.१६/६/२०२३

२) मा.अति.महा.आयुक्त (विशेष) कार्यालयाकडील जा.क्र.९११,दि.२३/५/२०२३

३) मे.द्वारिका लाईट अँड साऊंड यांचे दिनांक १७/७/२०२३ चे बिल मागणी पत्र.

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१५४९,दि.८/२/२०२४ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६३५,दि.९/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

दि.११/६/२०२३ ते २४/६/२०२३ या कालवधीमध्ये पुणे येथे झालेल्या G20 परिषद बैठकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विविध कामांसाठी महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम मधील कलम क्रमांक ६७(३)क, अन्वये खालील बाबी मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

१) G20 परिषद बैठकीच्या अनुषंगाने मे.द्वारिका लाईट अँड साऊंड यांच्याकडून मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रामधील तक्ता क्र.१ नुसार विद्युत विषयक कामे निविदा न काढता महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम मधील कलम क्र.६७(३) क, अन्वये करण्यास.

२) मे.द्वारिका लाईट अँड साऊंड यांना, त्यांनी केलेल्या कामापोटी र.रू.७०,३४,८९६/- पर्यंत बिल अदा करण्यास, त्यासाठी त्यांचे समवेत कोणताही करारनामा न करणेस तसेच कोणतीही अनामत रक्कम न घेणेस.

३) G20 परिषद बैठकीच्या अनुषंगाने मे.द्वारिका लाईट अँड साऊंड यांच्याकडून विद्युत विषयक कामे निविदा न काढता महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम मधील कलम क्र.६७(३)क, अन्वये रक्कम रूपये ७०,३४,८९६/- पर्यत करून घेणेस.

**विषय क्र.४१२**

संदर्भ :- १) सकाळ मिडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे क्रीडा विभागाकडील आ.क्र.१५५१,दि.११/१२/२०२२ रोजीचे पत्र

२) मुख्य लेखा व वित्त विभागाकडील जा.क्र.४३९३,दि.१५/१/२०२४ अन्वये मा.वित्तीय समिती मान्यतेसाठी बैठकीचे इतिवृत्त

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/१५५०, दि.८/२/२०२३ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६३६,दि.९/२/२०२४

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

सकाळ माध्यम समूहाच्या वतीने १० डिसेंबर २०२३ रोजी बजाज अलियान्झ पुणे हाफ मॅरेथॉन स्पर्धेकरिता पुणे महानगरपालिकेतर्फे सह प्रायोजक म्हणून र.रू.२०लक्षचे खालील वर्गीकरणांने अर्थसहाय्य देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक, माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>पुणे मनपा मुख्य भवन येथे अद्ययावत सेन्ट्रलाईजड कमांड सेंटर उभारणे.<br>बजेट कोड- CE30A101/I1-1 | २० लक्ष | --- |
| नविन सुचविलेले काम –<br>क्रीडा विभाग-<br>पुणे शहरात विविध संस्थामार्फत हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करणे (RE27A176 ) अंतर्गत सकाळ माध्यम समूहाच्या वतीने १० डिसेंबर २०२३ रोजी बजाज अलियान्झ पुणे हाफ मॅरेथॉन स्पर्धेकरिता पुणे महानगरपालिकेतर्फे सह प्रायोजक म्हणून एकूण र.रू.३५ लक्ष अर्थसहाय्य सकाळ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड (Sakal Media Private Limited ) यांना धनादेश / आरटीजीएस द्वारे अदा करणेसाठी अपूर्ण पडणारी तरतूद वर्गीकरणाद्वारे उपलब्ध होणेबाबत. | --- | २० लक्ष |

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.४१३**

**संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे मनपा जा.क्र.मआ/शआ/१२३०, दि.१३/०१/२०२३
२) माजी सभासद सौ.शीतल ज्ञानेश्वर शिंदे यांचे आ.क्र.११९३९, दि.२८/१०/२०२२ रोजीचे पत्र.
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४० ,दि.८/२/२०२३
४) मनपा ठराव क्र.३९७, दि.१७/२/२०२३
५) मनपा ठराव क्र.४३८, दि.२०/३/२०२३
६) मनपा ठराव क्र.३३, दि.२६/४/२०२३
७) मनपा ठराव क्र.६०, दि.३०/५/२०२३
८) मनपा ठराव क्र.८४, दि.२०/६/२०२३
९) मनपा ठराव क्र.१४४, दि.२५/८/२०२३
१०) मनपा ठराव क्र.२२७, दि.२०/१०/२०२३

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मौजे वडगावशेरी हे गाव पुणे महानगरपालिकेमध्ये १९९७ साली समाविष्ट झाले असून सदर गावांचा विकास आराखडा सन २००५ साली प्रसिध्द झाला असून सन २००७ मध्ये टप्प्याटप्प्याने सदर डी.पी.मान्य झाला आहे.असे नमूद केले असून सन २००७ पासून आजतागायत वडगावशेरी येथील स.नं.१७/१/३न, १०/४, ११/१/२/३ मधील डी.पी.रस्त्याखालील जागा पुणे मनपाच्या ताब्यात आलेल्या नाही व तसेच स्थानिक जागामालक रस्ते विकसित करणेकरीता विरोध होत असल्यामुळे वडगावशेरी गावाचा विकास झालेला नाही. तसेच रस्त्यांची कनेक्टीव्हीटी पूर्ण होत नसल्यामुळे विकसित रस्त्याचा वापर करणे शक्य होत नसून वाहतूक कोंडी होत आहे. सदर गावामधील रस्ते विकसित / ताब्यात येण्याच्या दृष्टीने रोज होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सदर गावामध्ये स.नं.१७/१/३ब, १०/४, ११/१/२/३ येथे टी.पी.स्कीम राबविणे गरजेचे आहे. वडगावशेरी गावातील स.नं.१७/१/३ब, १०/४, ११/१/२/३ या ठिकाणी रस्ते ताब्यात येण्यासाठी टी.पी.स्कीम राबविण्यास खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | समाविष्ट भाग ( स.नं.) |
|---|---|---|
| १ | वडगावशेरी | स.नं.११(पै),१०/४,१०(पै) |

१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५९ नुसार कलम ६०(१) अन्वये नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे नगररचना परियोजना राबविणेस.

२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ६०(२) अन्वये इरादा शासकीय राजपत्रात व दैनिक वर्तमानपत्रात जाहीर करणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठ.क्र.२८७, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे.)

विषय क्र.४१४

संदर्भ – १) विकसक,मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरिंग सर्व्हिसेस तर्फे श्री.शिरीष दोषी यांनी ला.आर्की.श्री.विकास अचलकर यांचेमार्फत आ.क्र.बीएनआर/००८९/०९,दि.९/११/२०२३ अन्वये दाखल केलेला प्रस्ताव.

२) मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका जा.क्र.मआ/शआ/१३६०,दि.२३/१/२०२४

३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०३ ,दि.३१/१/२०२४

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

सन २०१७ च्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील कलम १५.२.१३ नुसार लॅण्डलॉक प्रॉपर्टीबाबत खालीलप्रमाणे तरतूद असून युडीसीपीआर–२०२० मधील कलम ३.३.१४ नुसार कायम आहे.

In case of a plot surrounded on all sides by other plots or reservation,if any,i.e.a.land locked plot which has no access to any street or road, the Authority may require access through an adjoining plot or plots and shall,as far as possible be nearest to the street or road, to the land locked plot,at the cost of owner of the land-locked plot & such other conditions as the authority may specify.If the Plot is land locked by any reservation, then access may be made available by adjusting reservation within owners land without reduction in area. Such land locked plot,upto 100 mt.shall be considered as fronting on the main road from which the access of minimum 9 mt.width is made available.

वरील तरतुदीनुसार स.नं.२६/१/१,२६/१/३,२६/१/४,२६/१/५ या लॅण्डलॉक असणाऱ्या मिळकतीस मनपाच्या ताब्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसमधून पोहोच रस्ता उपलब्ध करून देणेस खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) युडीसीपीआर–२०२० कलम ३.३.१४ नुसार बाणेर स.नं.२६/१/१,२६/१/३,२६/१/४,२६/१/५ या लॅण्डलॉक मिळकतीस म.न.पा.च्या ताब्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसमधून १२.० मी.रूंदीचा पोहोच रस्ता उपलब्ध करून देणेस.

२) मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत ॲमेनिटी स्पेसच्या अदलाबदल हस्तांतरण दस्ताबाबतची कार्यवाही करणेस.

३) बाणेर स.नं.२६/१/१,२६/१/३,२६/१/४,२६/१/५ या मिळकतीतील ॲमेनिटी स्पेससह उपरोक्त १ नुसार पोहोच रस्ता उपलब्ध केल्याने कमी होणाऱ्या क्षेत्राइतकी वाढीव ॲमेनिटी स्पेस पुणे म.न.पा.चे ताब्यात घेणेस.

विषय क्र.४१५

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१३६६, दि.२३/१/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०४, दि.३१/१/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशिल | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स.नं.५३९अ, फा.प्लॉ.क्र.१६३ व १६३अ, घोरपडे पेठ,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.अंजुमन-ए-ताहेरी | रेडीकनर नुसार | ७५९४.३९ चौ.मी. (इमारत ए चे आर.सी.सी. व वीट बांधकाम पुर्णत्वापोटीचा ३५% मधील फरकाचे टी.डी.आर.) | ००४७०३ | जानेवारी २०२४ |

मा.नांव समितीचे ठराव

विषय क्र.४१६

संदर्भ – १) मुख्य सभा ठराव क्र. ४, दि.२०/०४/२०१७

२) मनपा ठराव क्र.१९, दि.११/४/२०२२

३) मनपा ठराव क्र.१४०, दि.२५/७/२०२२

४) मनपा ठराव क्र.२०६, दि.२३/९/२०२२

५) मनपा ठराव क्र.२९६, दि.१/१२/२०२२

६) मनपा ठराव क्र.४००, दि.१७/२/२०२३

७) मनपा ठराव क्र.४४, दि.२६/४/२०२३

८) मनपा ठराव क्र.८८, दि.२०/६/२०२३
९) मनपा ठराव क्र.१४५, दि.२५/८/२०२३
१०) मनपा ठराव क्र.२३५, दि.२०/१०/२०२३

**विषयः-** पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

नाव समितीची सभा गुरूवार दि.१०/०३/२०२२ रोजी दुपारी ३.३० (तीन वाजून तीस मिनिटे) विशेष समिती सभागृह, दुसरा मजला पुणे महानगरपालिकेची नविन विस्तारित इमारत येथे दृकश्राव्य (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) द्वारे भरली होती. त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र. | सुचकाचे नाव | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नाव | मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ५२५ | मा.गणेश ढोरे<br>मा.अश्विनीताई पोकळे | प्रभाग क्र.४२अ,भेकराईनगर, गंगानगर, बनकर शाळेजवळील विरंगुळा केंद्रास | शहिद सौरभ फराटे विरंगुळा केंद्र | मान्य |
| ५३० | मा. श्री. युवराज बेलदरे<br>मा. श्री. वसंत मोरे<br>मा. श्रीमती अमृताताई बाबर<br>मा. सौ. स्मिताताई कोंढरे | प्रभाग क्र.४० मधील फ्लेनगर स.नं. ३४ येथील ओटा मार्केट इमारतीस | “ स्व.श्री. संभाजी नाना बेलदरे (मा. सरपंच) बहुउददेशीय भवन” | मान्य |
| ५३१ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसेन जगताप | प्रभाग क्र. ४१मध्ये कोंढवा बु.स.नं. २९/२४/२५/१८ येथील ॲमेनिटी स्पेस वरती विकसित करण्यात आलेल्या प्लेस मेकींग या परिसरास | “ कै. राजेंद्र मारूती मरळ” | मान्य |
| ५३२ | मा. श्रीमती रंजना टिळेकर<br>मा. सौ. वृषाली कामठे<br>मा. श्री. विरसिंग जगताप | प्रभाग क्र. ४१ मध्ये कोंढवा बु. स.नं. २४ व २५ या परिसरास | “ ह. भ.प. कै. बेबीताई रघुनाथ मरळ” | मान्य |
| ५३३ | मा. श्री. प्रकाश ढोरे<br>मा.सौ.अर्चना मुसळे | प्रभाग क्र. ८ ड बोपोडीमधील नवीन ई- लर्निंग शाळेस | “ स्व. सुमनताई ज्ञानोबा ढोरे ई- लर्निंग स्कुल” | मान्य |
| ५३४ | मा. सौ. राजश्री नवले<br>मा. श्री. हरिदास चरवड<br>मा. श्री. राजाभाऊ लायगुडे | प्रभाग क्र.३३ मधील प्रयेजा सिटी ते नांदेड सिटी येथील स.नं. ७१ वडगांव बुद्रुक ते स.नं. ३९ वडगाव खुर्द येथील डी.पी. रस्त्यास | “ कै. उमाकांत पांडुरंग कुंभारकर पाटील मार्ग” | मान्य |
| ५३५ | मा. श्री. धनराज घोगरे<br>मा. सौ. कालिंदा पुंडे<br>मा. रघुनाथ गौडा | प्रभाग क्र. २५ श्रीमंत महादजी शिंदे मनपा प्राथमिक शाळा क्र. ६२ बी येथे नव्याने तयार होणाऱ्या बास्केट बॉल कोर्ट व पॅवेलियनला | “श्रीमंत महादजी शिंदे बास्केटबॉल कोर्ट व पॅवेलियन” | मान्य |
| ५३६ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी स.नं. ११/४/५ राज ब्लीस व युवानील सोसा.कडे जाणाऱ्या रस्त्यास | “ कै. यमुनाताई पोकळे नगर” | मान्य |
| ५३७ | मा. सौ. अश्विनी पोकळे<br>मा. श्री. गणेश ढोरे | प्रभाग क्र. ४२ ब धायरी रायकर मळयाकडे जाणाऱ्या पुलास | “ शिवभक्त श्री जैतुजीबाबा रायकर” | मान्य |
| ५३८ | मा.सौ.नंदा लोणकर<br>मा.श्री.संजय घुले<br>मा.श्री.प्रमोद भानगिरे | प्रभाग क्र.२६ क मधील ज्योती हॉटेल चौक ते एन.आय.बी.एम.चौक पर्यंतच्या रस्त्यास | पेरिनशेरी माझदा रस्ता | नांव देणे अडचणीचेआहे अशा अशयाचा मा. मुख्य अभियंता वाहतुक नियोजन विभाग यांचा अभिप्राय मान्य |
| ५३९ | मा.सौ.हेमलता मगर<br>मा.चेतन तुपे पाटील | प्रभाग.क्र.२२ ब मगरपट्टा येथील मगरपट्टासिटी पोलिस | कै.निवृत्ती शंकर मगर पथ | मान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मा.सुनिल उर्फ बंडुतात्या गायकवाड | चौकी समोरील मगरपट्टासिटी कडे जाणाऱ्या रस्त्यास | | |

( टीप – सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२८८, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.४१७**

**संदर्भ –** १) मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७
२) मा.सुशिल मेंगडे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांची दि.१७/२/२०२२ ची उपसूचना.
३) मुख्य सभा ठराव क्र.८३४,दि.१७/२/२०२२
४) मुख्य सभा ठराव क्र.८४,दि.१७/६/२०२२
५) मुख्य सभा ठराव क्र.१२०,दि.२५/७/२०२२
६) मुख्य सभा ठराव क्र.२०७,दि.२३/९/२०२२
७) मुख्य सभा ठराव क्र.२९७,दि.१/१२/२०२२
८) मुख्य सभा ठराव क्र.४०१,दि.१७/२/२०२३
९) मुख्य सभा ठराव क्र.४५,दि.२६/४/२०२३
१०) मुख्य सभा ठराव क्र.८९,दि.२०/६/२०२३
११) मुख्य सभा ठराव क्र.१४६,दि.२५/८/२०२३
१२) मुख्य सभा ठराव क्र.२३६,दि.२०/१०/२०२३

विषय :- पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

------

**संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार –**

वरील विषयांकित बाबींवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा बुधवार **दि.१५/१२/२०२१** रोजी **दुपारी ०३.०० ( तीन )वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.सदरचे नांव समितीचे निवेदन दि.१७/२/२०२२ च्या मा.मुख्य सभेत मान्यतेसाठी आले असता मा.मुख्य सभा विषय क्र.७०८ मधील अनु.क्र.१८० हा विषय माहे जून २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठ.क्र.८३४,दि.१७/२/२०२२ संदर्भ क्र.२ चे उपसूचनेनुसार निर्णय झाला आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| **१८०** | औंध येथील पुणे मनपा शाळा क्र.८७ मुलांची या शाळा इमारतींच्या आवारातील क्रिडांगणास | योगीराज रामचंद्र मुसळे | मान्य |

( टीप – सदर विषय माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मुख्य सभा ठराव क्र.२८९,दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.४१८**

**संदर्भ –** १) मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७
२) मा.सुशिल मेंगडे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांची दि.१७/२/२०२२ ची उपसूचना.
३) मुख्य सभा ठराव क्र.८३७,दि.१७/२/२०२२
४) मुख्य सभा ठराव क्र.८५,दि.१७/६/२०२२
५) मुख्य सभा ठराव क्र.१२१,दि.२५/७/२०२२
६) मुख्य सभा ठराव क्र.२०८,दि.२३/९/२०२२
७) मुख्य सभा ठराव क्र.२९८,दि.१/१२/२०२२
८) मुख्य सभा ठराव क्र.४०२,दि.१७/२/२०२३
९) मुख्य सभा ठराव क्र.४६,दि.२६/४/२०२३
१०) मुख्य सभा ठराव क्र.९०,दि.२०/६/२०२३
११) मुख्य सभा ठराव क्र.१४७,दि.२५/८/२०२३
१२) मुख्य सभा ठराव क्र.२३७,दि.२०/१०/२०२३

विषय :- पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

------

**संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार –**

वरील विषयांकित बाबींवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा बुधवार **दि.१५/१२/२०२१** रोजी **दुपारी ०३.१५ ( तीन वाजून पंधरा )वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.सदरचे नांव समितीचे निवेदन दि.१७/२/२०२२ च्या मा.मुख्य सभेत मान्यतेसाठी आले असता मा.मुख्य सभा विषय क्र.७११ मधील अनु.क्र.२९२ हा विषय माहे जून २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठ.क्र.८३७,दि.१७/२/२०२२ संदर्भ क्र.२ चे उपसूचनेनुसार निर्णय झाला आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| **२९२ त्वर्य** | प्रभाग क्र.८ब, औंध येथील पुणे महानगरपालिका शाळा क्र.८७ब,च्या स्टेडियमच्या पाठीमागे निर्माण केलेल्या महिला कुस्ती केंद्राला. | स्व.गुलाबराव देवराव मुंढे | मान्य |

( टीप - सदर विषय माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मुख्य सभा ठराव क्र.२९०,दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे. )

**<u>मा.सभासदांचा प्रस्ताव</u>**

**<u>विषय क्र.४१९</u>**

संदर्भ :- मा. धनराज घोगरे व मा.राजेश येनपुरे यांची सूचना दि.२८/२/२०२०

१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२)१३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ-नअ-वियो-२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

**१)** वानवडी स.नं.६२, हि.नं.७,८ मधून २० फुटांचा रस्ता आखण्याचा ठराव आहे. जागेवर हिश्श्यांचे मध्ये भागातील ३० फुट रस्त्याचे पूर्वेस श्री.बिलाल मिस्त्री यांची जागा आहे. मिस्त्री यांचे जागेत पूर्वेकडे गुंठेवारी पध्दतीची बांधकामे झालेली आहे. तेथील रहिवासियांनी वर नमूद केल्याप्रमाणे १० ते १२ फुटाची जागा सामाईक रस्त्यासाठी मोकळी जोडलेली आहे. या रिहवासियांना रस्ता मिळणे आवश्यक आहे. मूळ ठरावात नमूद केल्याप्रमाणे हिश्याचे मध्यभागातून रस्ता आखावयाचा झाल्यास श्री.मिस्त्री यांनी प्रथमच पासूनच अशा रस्त्याच्या आखणीस विरोध केल्यास्तव मिस्त्री यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचे जागेच्या दक्षिणेकडील १० फुट जागा रस्त्यासाठी त्यांनी मोकळी सोडली आहे. त्यांचे जागेतून दक्षिण उत्तर असा ( चॅम्पर) हा आखावा लागणार आहे. श्री.मिस्त्री यांचे पूर्वेकडील जागेतील गुंठेवारी पध्दतीची बांधकामातील सुटलेल्या जागेचाही सामाईक रस्त्याची रूंदी ही.डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार मिळत नसल्याने त्या भागात रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अ, ब.ब-१ आद्याक्षराप्रमाणे दर्शविल्यानुसार २० फुट रूंदीचा रस्ता आखणे योग्य होईल.

**२)** वानवडी स.नं.६२,हि.नं.६ मध्येही गुंठेवारी पध्दतीची बांधकाम असून तेथेही सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागाही १० ते १२ फुट इतकीच आहे. डी.सी.रूल क्र.नियम क्र.१२ नुसार सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागा ही रूंदीपात्र ठरत नसल्याने याही हिश्यात पुरेशी रूंदी अभावी रस्त्याची आखणी करणे संयुक्त होणार नाही.

**३)** वानवडी स.नं.६२, हि.नं.१ ते १२ मध्येही दक्षिण-उत्तर अशीच गुंठेवारी पध्दतीची बांधकामे असून तिथेही १० ते १२ फुट सामाईक रस्त्यासाठी जागा सुटलेली आहे. डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार रस्त्याच्या रूंदी मिळत नसल्याने रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही.

तरी वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२२०, दिनांक२४/८/२००० चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :- १) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त(वि)यांनी पत्र क्र.मआ-नअ-वियो-२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला

अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

७) मनपा ठराव क्र.२०७ दि.२१/१२/२०२०

८) मनपा ठराव क्र.१८७,दि. २१/९/२०२१

९) मनपा ठराव क्र.६६२,दि. २२/११/२०२१

१०) मनपा ठराव क्र.२०,दि. ११/४/२०२२

११) मनपा ठराव क्र.१४१,दि.२५/७/२०२२

१२) मनपा ठराव क्र.२०९,दि.२३/९/२०२२

१३) मनपा ठराव क्र.२९९,दि.१/१२/२०२२

१४) मनपा ठराव क्र.४०३,दि.१७/२/२०२३

१५) मनपा ठराव क्र.४७,दि.२६/४/२०२३

१६) मनपा ठराव क्र.९१,दि.२०/६/२०२३

१७) मनपा ठराव क्र.१४८,दि.२५/८/२०२३

१८) मनपा ठराव क्र.२३८,दि.२०/१०/२०२३

----

वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखावा असे दर्शविलेले आहे. परंतु 'अ' आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता हा रद्द करण्यात यावा.कारण सदर ठिकाणी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात 'ब-ब१' या आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता २० फुट रूंदीचा आखण्यात यावा.

(टिप - सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २०२४ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२९१, दि.२०/१२/२०२३ चा झाला आहे.)

**प्र.नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**